शनिवार, १० डिसेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १४२
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## महाराष्ट्र-कर्नाटक बससेवा ७२ तासांनंतर पूर्ववत



**कोल्हापूर :** सीमावादावरून बंद असलेली महाराष्ट्र आणि कर्नाटक बससेवा पुन्हा सुरू झाली आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील वाहनांवर बेळगाव येथील हिरेबागवाडी टोलनाक्यावर दगडफेक केली होती. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ठप्प झाली. सीमा समन्वयक मंत्री चंद्रकांत पाटील आणि शंभूराज देसाई हे बेळगावला जाऊन महाराष्ट्र एकीकरण समितीची भेट घेणार होते, मात्र मंत्री बेळगावात येऊ नये यासाठी कन्नड संघटनांनी बेळगावात धुडगूस घातला आणि बसेसची तोडफोड केली. सीमावाद चिघळल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून दोन्ही राज्यांतील बससेवा तात्पुरती बंद करण्यात आली होती. अखेर ती ७२ तासांनंतर पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

### अंतरंग

मराठा उद्योजकांसाठी बँक ऑफ इंडियाबरोबर सामंजस्य करार/२

आधुनिक महाराष्ट्राचा विकासमार्ग : समृद्धी महामार्ग (लेख)/४

राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी 'सीकेटी'च्या विनीतची निवड/८

# समृद्धी महामार्ग महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा

## मुख्यमंत्र्यांनी घेतला लोकार्पण सोहळ्याच्या तयारीचा आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा असलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचे येत्या रविवारी म्हणजेच ११ डिसेंबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. या सोहळ्याच्या तयारीचा आढावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी (दि. ९) घेतला.



नागपूर दौऱ्यावर येत असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मेट्रो ट्रेनमधून प्रवास करणार असून समृद्धी महामार्गावरूनदेखील प्रवास करणार आहेत. पंतप्रधानांच्या उपस्थितीत होणाऱ्या लोकार्पण सोहळ्यात भरगच्च कार्यक्रमांचा समावेश आहे.

दरम्यान, गुरुवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत नागपूर मेट्रो टप्पा २ आणि नाग नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पाला मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी पंतप्रधानांचे आभार मानले.

राज्य सरकारने उभारलेला देशातील सर्वाधिक लांबीचा वेगवान असा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा ठरणार आहे, असे या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी समृद्धी महामार्गाच्या लोकार्पण सोहळ्याच्या तयारीचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीस मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, राजशिष्टाचार विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर उपस्थित होते, तर नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी प्रसन्ना बिदरी, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपरवार, नागपूरचे जिल्हाधिकारी विपीन इटनकर, पोलीस आयुक्त अमितेशकुमार, महामेट्रोचे ब्रिजेश दिक्षित आदी दूरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

(छाया : लक्ष्मण ठाकूर)



# 'रयत'साठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सातत्याने सहकार्य

## आमदार दिलीप वळसे-पाटील यांचे गौरवोद्गार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या बाबतीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे सहकार्य करण्यासाठी कधीही मागे राहत नाहीत. सतत त्यांचा हात वाढताच असतो, असे गौरवोद्गार राज्याचे माजी गृहमंत्री तथा 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी शुक्रवारी (दि. ९) कामोठे येथे काढले.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा १२ डिसेंबर रोजी ८२वा वाढदिवस आहे तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सभासदत्व हे अध्यक्ष शरद पवार यांना प्राप्त झाल्यास यंदा ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त कृतज्ञता सप्ताह साजरा केला जात आहे. त्या अंतर्गत कामोठे येथील माजी आमदार दत्तूशेठ पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये रायगड विभाग कामोठे-पनवेलच्या वतीने ४० हजार स्क्वेअर फुटी महारांगोळी तसेच खुल्या गटातील रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांचे उद्घाटन आमदार दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते.




या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे रायगड विभागीय चेअरमन आमदार बाळाराम पाटील, जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, नावडे आयटीआयचे चेअरमन बाळाराम खुटारकर, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन एकनाथ पाटील, 'रयत'चे रायगड विभाग सहाय्यक अधिकारी एस. एस. फडतरे, रायगड विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर यांच्यासह स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य, पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते.

# मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम जलदगतीने पूर्ण करा : ना. रवींद्र चव्हाण

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत तसेच या महामार्गावरील इंदापूर ते झारापदरम्यानच्या चौपदीकरणाचे काम जलदगतीने पूर्ण करावे. अपूर्ण कामे पूर्ण करून जनतेला तातडीने दिलासा द्यावा, असे निर्देश सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिले.

मुंबई-गोवा महामार्गावरील कामासंदर्भात मंत्री रवींद्र चव्हाण यांनी गुरुवारी (दि. ८) सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग यांच्यासह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर आढावा घेतला. या वेळी ना. चव्हाण यांनी पनवेल ते इंदापूर या मार्गावरील कासू ते इंदापूर टप्पा क्र.१, पनवेल ते कासू (वडखळजवळ) टप्पा क्र.२ आदींची सद्यस्थिती, या मार्गावरील दुरुस्तीचे काम, त्याचप्रमाणे इंदापूर ते झारापदरम्यानच्या बळकटीकरण व चौपदीकरण कामाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला आणि सर्व कामे तांत्रिकदृष्ट्या कशा पद्धतीने



जलदगतीने पूर्ण करण्यात येतील याबाबत सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या महामार्गावरील परशुराम घाट, कशेडी घाट आदी घाटरस्त्यांच्या लांबीतील उतारांचे स्थिरीकरण करून अपघातमुक्त करण्याबाबत तसेच हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात मंत्री चव्हाण यांनी सूचना दिल्या. या कामातील ज्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणी असतील त्या दूर करण्याच्या दृष्टीने सर्वांनी तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

परशुराम घाटातील ग्रामस्थांचे स्थानांतरण करण्यासाठी दोन कोटी रुपये निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. तो तत्काळ संबंधितांना वितरीत करण्यात यावा, असेही मंत्री चव्हाण यांनी या वेळी सूचित केले.

## दहावी, बारावी परीक्षेसाठी कोरोनापूर्व नियमावली

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून यंदाच्या दहावी, बारावी परीक्षांमधील दोन नियम बदलण्यात आले आहेत. यंदाच्या परीक्षा कोरोनापूर्व काळाप्रमाणे घेण्यात येणार आहेत.

एसएससी आणि एचएससी बोर्डाच्या परीक्षा पुढील वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये होत आहेत. विद्यार्थ्यांना यंदापासून त्यांच्या शाळेतच त्यांचे परीक्षा केंद्र मिळणार नाही तसेच कोरोना काळात जो ३० मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला जात होता तोदेखील रद्द करण्यात आला आहे. कोरोना महामारीवेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या होम सेंटर्सची म्हणजेच ते शिकत असलेल्या शाळेतच परीक्षेची सुविधा आणि अतिरिक्त वेळ सुरू करण्यात आला. आता कोरोनाचा फार मोठा धोका नसल्यामुळे जुने नियम परत आणण्यात आले आहेत.



# तलाठी भरती, मंडळ अधिकारी पदोन्नतीला गती

## महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांपासून राज्यात तलाठी पदाच्या अनेक जागा रिक्त होत्या. एकाच तलाठयाकडे अनेक गावे सोपविण्यात आल्याने कामांना विलंब व्हायचा आणि महसूल यंत्रणेवर ताण येत होता. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी तलाठी भरती आणि मंडळ अधिकारी पदोन्नती प्रक्रियेला गती मिळावी यासाठी पुढाकार घेतला होता. येत्या काही दिवसांमध्ये तलाठी भरती आणि मंडळ अधिकारी पदोन्नती प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

तीन हजार ११० तलाठी आणि ५१८ मंडळ अधिकारी असे एकूण तीन हजार ६२८ पदे निर्माण करण्यात येणार



असल्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

गावात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा तलाठी याच्याशी संबंध येत असतो. ७/१२, विविध दाखले यासाठी नियमितपणे तलाठी यांच्या संपर्कात राहावे लागते. तलाठी हे पद ग्रामीण भागात अत्यंत महत्त्वाचे असते. आता होणाऱ्या तलाठी भरतीमुळे सध्या कार्यरत असलेल्या तलाठी वर्गाचा भार कमी होण्यास मदत होणार आहे. तलाठी सजा पुनर्रचनेनुसार विहीत केलेल्या निकषाच्या अनुषंगाने संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडून महसुली विभागनिहाय प्राप्त माहितीस अनुसरुन वाटप करण्यात आलेल्या तीन हजार ११० साझे आणि ५१८ महसुली मंडळ कार्यालयासाठी तीन हजार ११० तलाठी भरती आणि ५१८ मंडळ अधिकारी यांची पदोन्नती असे एकूण तीन हजार ६२८ पदे निर्मितीला मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय ७ डिसेंबर २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

पुणे महसुली विभागांतर्गत एकूण ६०२ तलाठी साझे आणि १०० महसुली मंडळे आहेत. अमरावती महसुली विभागांतर्गत एकूण १०६ तलाठी सजा आणि १८ महसुली मंडळे आहेत. नागपूर महसुली विभागांतर्गत एकूण ४७८ तलाठी सजा आणि ८० महसुली मंडळे आहेत. औरंगाबाद महसुली विभागांतर्गत एकूण ६८५ तलाठी सजा आणि ११४ महसुली मंडळे आहेत. नाशिक महसूली विभागांतर्गत एकूण ६८९ तलाठी सजा आणि ११५ महसुली मंडळे आहेत. कोकण महसुली विभागांतर्गत एकूण ५५० तलाठी सजा आणि ९१ महसुली मंडळे आहेत.

# भूमिपुत्र, ठेकेदारांचे प्रश्न सरकारकडे मांडणार

## आमदार गणेश नाईक यांचे आश्वासन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहराच्या निर्मितीत आणि कोरोनाच्या संकटकाळात कामगार, सफाईची कामे घेणाऱ्या ठेकेदारांनी दिलेले योगदान हे अत्यंत महत्त्वाचे आहे, परंतु पालिकेचे अधिकारी जर त्यांना वेठीस धरत असतील तर ते खपवून घेतले जाणार नाही. आपण त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडू असे आश्वासन भाजप आमदार गणेश नाईक यांनी दिले.

नवी मुंबईचे माजी उपमहापौर दशरथ भगत यांच्या पुढाकाराने आणि नवी मुंबई कॉन्ट्रॅक्टर वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने स्थानिक ठेकेदारांच्या हक्काच्या संरक्षणासाठी नवी मुंबई बचाव परिषदचे आयोजन वाशीत करण्यात आले होते. या



वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमदार गणेश नाईक यांनी संवाद साधला.

या कार्यक्रमाला माजी नगरसेविका वैजयंती भगत, माजी नगरसेवक सुनील पाटील, असोसिएशनचे अध्यक्ष रेनील जेकब, उपाध्यक्ष राजेश साळी, खजिनदार जयवंत पवार, सचिव जितेंद्र रौंदळे व सदस्य आनंद वैश्य, महेश ठाकूर, कोअर कमिटीचे जगदीश पाटील, अमित मढवी, निलिमा मढवी, जितेंद्र म्हात्रे, प्रशांत भोईर, वासुदेव पाटील, आर. पी. भगत, मनीष पाटील, निमंत्रक शैलेश घाग आदी उपस्थित होते.

माजी उपमहापौर दशरथ भगत यांनी, बाहेरच्यांना कामे देऊन दंडेलशाही करणाऱ्या अधिकाऱ्यांना धडा शिकवू, असा इशारा भगत दिला.

### *आगामी काळात वन टाईम प्लॅनिंग योजना*

***नवी मुंबईकर जनतेने २५ वर्षांपासून माझ्यावर टाकलेला विश्वास हा सार्थ ठरविला आहे. बेलापूर येथे राबविण्यात आलेली आणि विरोधकांच्या आरोपानंतरही यशस्वी करून दाखविलेली वन टाईम प्लॅनिंग योजना आगामी कालावधीत प्रत्येक नोडमध्ये आगामी कालावधीत राबविणार असून त्यात भूमिपुत्रांना प्राधान्य दिले जाईल, अशी घोषणा आमदार गणेश नाईक यांनी केली.***

# मराठा उद्योजकांसाठी बँक ऑफ इंडियाबरोबर सामंजस्य करार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात एक लाख मराठा उद्योजक तयार होण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बँक ऑफ इंडियाबरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे अशी माहिती, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी दिली.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून विविध योजना राबविण्यासाठी व या योजनांमधून मराठा उद्योजक तयार होण्यासाठी बँक ऑफ इंडियाबरोबर आज त्यांच्या मुख्य कार्यालयात करार करण्यात आला. त्यावेळी पाटील बोलत होते. या वेळी बँक ऑफ इंडियाचे जनरल मॅनेजर एस. के. रॉय, झोनल मॅनेजर एस. बी. सहानी, मुंबई साऊथ झोनचे डेप्यूटी झोनल मॅनेजर बिरेन चॅटर्जी, लीड डिस्ट्रीक्ट मॅनेजर निलेश वैती उपस्थित होते.

अध्यक्ष पाटील म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यातून महाराष्ट्रामध्ये जास्तीत जास्त मराठा समाजाचे तरुण हे उद्योजक झाले पाहिजे याकरिता प्रयत्न करीत आहोत.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आज पारितोषिक वितरण

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य शास्त्र महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण सोहळा शनिवारी (दि. १०) आयोजित करण्यात आला आहे.

निबंध स्पर्धेमध्ये प्रथम फलक खान (एसईएस जुनियर कॉलेज कळंबोली), द्वितीय प्राची डोंगरे (लोकनेते रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज कामोठे) व तृतीय क्रमांक अर्पिता पाटील (टी. एन. घरत ज्युनिअर कॉलेज उलवे) हिने पटकाविला.

वाणिज्य शाखेतील प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये प्रथम एडिसन ग्रुप एक दीपक माळी व सुनील चव्हाण (चांगू काना ठाकूर ज्युनिअर कॉलेज पनवेल), द्वितीय दिव्या पाटील व श्रवण घाडगे (एसइएस ज्युनियर कॉलेज कळंबोली), तृतीय क्रमांक रुदरफोर्ड ग्रुप आर्यन सिंग व धनुष राजन (रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज खारघर) यांनी पटकाविला. प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये प्रथम ओमकार लोंढे व सरान भांगे, द्वितीय अनिश नहाटे व साहिल मोरे, तृतीय क्रमांक स्नेहा तोडेकर व आदिती चौधरी (रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र विद्यालय खारघर) यांनी पटकाविला.

शनिवारी महाविद्यालयात विजेत्यांना पारितोषिक वितरण आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख हे उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थ्यांनी पालकांसोबत पारितोषिक वितरण समारंभासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड व रामशेठ ठाकूर ज्युनियर महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर यांनी केले आहे.

# जिल्हा रुग्णालयात दिव्यांगांना साहित्य वाटप

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना साहित्यवाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात दिव्यांगांना आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते जिल्हा तीनचाकी सायकल, व्हिलचेअर, श्रवणयंत्र यांचे वाटप करण्यात आले. दिव्यांग बांधवांच्या अडचणी सोडविण्यासाठी व योग्य सुविधा देण्यासाठी पहिल्यांदाच स्वतंत्र दिव्यांग मंत्रालयाची स्थापना



करण्यात आली असून या कार्यात आता अजून वेग येईल, असे आमदार महेंद्र दळवी म्हणाले. अन्य दिव्यांग बांधवांनी आवश्यक साहित्य मिळण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात आधार कार्ड व यूडीआयडी प्रमाणपत्र झेरॉक्स यांसह अर्ज करावा, असे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांनी सांगितले. या वेळी आदिती दळवी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद गवई आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रतिम सुतार यांनी मानले. कार्यक्रमासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे एनटीसीपीचे सामाजिक कार्यकर्ते सुशील साईकर, डीईआयसीचे सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदीप भोईर, प्रतिमा फडतरे, समाधान चौधरी, हितेश जाधव, कैलास सोमवंशी, मंगेश म्हात्रे आदींनी परिश्रम घेतले.

# गोवर लसीकरण मोहिमेस सहकार्य करावे –जिल्हाधिकारी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्याचे आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी राज्यातील गोवर परिस्थितीचा आढावा घेताना गोवर उद्रेक प्रतिबंध व नियंत्रणासंदर्भात टास्क फोर्स सभा घेण्याची सूचना व्हिसीद्वारे दिली होती. त्यानुसार नुकतीच जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा टास्क फोर्सची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली.

या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. प्रताप शिंदे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रविंद्र रोकडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ज्योत्सना शिंदे तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए)चे अध्यक्ष डॉ. विनायक पाटील उपस्थित होते. या बैठकीमध्ये गोवर उद्रेक व उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना सार्वजनिक विभागाव्यतिरिक्त सर्व शासकीय विभागांकडून मदत घेण्यात यावी, महिला व बालविकास विभाग, शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, ग्रामपंचायत विभाग सर्वेक्षणात मदत घ्यावी, आयएमए, निमा, आयएपी यासारख्या खासगी वैद्यकीय व्यवसायिक यांच्याकडूनही मदत घ्यावी, लसीकरण जनजागृती आपल्या क्षेत्रामध्ये प्रभावीपणे करावी, लसीकरण व सर्वेक्षण कृती आराखडे प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये तयार करण्यात यावे, ताप, पुरळ रुग्णांचे गतिमान सर्वेक्षण करावे, जिल्ह्यातील गोवर हॉटस्पॉटचा शोध घेऊन स्थानिक सूक्ष्म कृती आराखडा तयार करण्यात यावा, अशा सूचना दिल्या.

गोवर हा लसीकरणामुळे टाळता येणार आजार आहे. त्यामुळे पशुपालकांनी लसीकरणाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

# लग्न समारंभाला जात असताना अपघाती मृत्यू



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबईहून खालापुरातील एका हॉटेलमध्ये सहकारी मित्राच्या लग्न समारंभास जात असताना खालापूर टोल नाक्यावर लघुशंकेसाठी उतरलेल्या मुंबईच्या शैलेश तावडे यांचा अपघाती मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी (दि. ९) सायंकाळी साडेसहाच्या दरम्यान घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, जोगेश्वरी मुंबईहून एका खासगी कार्यालयातील सहकारी मित्राच्या लग्नसमारंभासाठी शैलेश तावडे टेम्पो ट्रॅव्हलरमधून खालापूर तालुक्यातील इमॅजिका नोवेलटेन हॉटेलमध्ये जात होते. खालापूर टोल नाक्यावर रांगेत टेम्पो थांबला असताना ते लघुशंकेसाठी उतरून रस्ता क्रॉस करीत असताना भरधाव आलेल्या ट्रकच्या चाकाखाली येऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# पनवेल महापालिका शाळांमध्ये मानवी हक्कांविषयी मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या दि. बा. पाटील शाळा तसेच दगडी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना मानवी हक्कांबाबत मार्गदर्शनाचा कार्यक्रम शुक्रवारी (दि. ९) घेण्यात आला.

१० डिसेंबर हा मानवी हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. मानवी हक्काबाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्त्वपूर्ण अविभाज्य भाग आहे. या कायद्यांतर्गत समाजातील तळागाळापर्यंत जनतेला मानवी हक्कांविषयी माहिती होणे व त्याबद्दल जनजागृती होण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे आदेश शासनाच्या वतीने देण्यात आले आहे. त्यानुसार आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदिका नूतन पाटील यांनी मानवी हक्कांविषयी माहिती दिली.

या वेळी विद्यार्थ्यांनी डिग्नीटी फ्रीडम ॲण्ड जस्टीस फॉर ऑल ही घोषणा दिली. या वेळी मिलिंद राणे, दि. बा. पाटील शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# गारवा वाढल्याने नागरिक सुखावले

**पनवेल** : डिसेंबर महिना सुरू झाला तरीदेखील हवेत गारवा नसल्याने नागरिक हैराण झाले होते, मात्र गुरुवारपासून मुंबईसह पनवेलमध्ये हवेत गारवा जाणवण्यास सुरुवात झाल्याने नागरिक सुखावले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून पनवेलमध्ये उष्णतेत वाढ झाली होती. गुरुवारी सकाळपासून थंड वारे वाहू लागल्याने नागरिक सुखावले.

# अखिल भारतीय कीर्तन संस्थेचे अध्यक्ष सुरेश उपाध्ये यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई येथील दादर भागात असलेल्या ८२ वर्षीय अखिल भारतीय कीर्तन संस्थेचे अध्यक्षपद गेली अनेक वर्षे समर्थपणे सांभाळणारे सुरेश उपाध्ये यांचे शुश्रुषा रुग्णालयात गुरुवारी (दि. ८) सकाळी निधन झाले.

काळाचौकी येथील शिवाजी शिक्षणोत्तेजक मंडळाच्या मुलांच्या शाळेत शिक्षक म्हणून उपाध्ये यांनी अनेक



वर्षे नोकरी केली. शिक्षकी नोकरीतून निवृत्त झाल्यावर आपल्या जीवनाचा उर्वरीत काळ त्यांनी कीर्तन संस्थेला दिला. कीर्तनसंस्थेचा आर्थिक तसेच सर्व प्रकारचा कारभार त्यांनी निस्पृहपणे चोखपणे सांभाळला. आजपर्यंत अनेक कीर्तनकार घडवण्यात तसेच कीर्तन संस्थेचे वर्षभर विविध उपक्रम त्यांनी राबवले.

संस्थेच्या आणि त्यांच्याशी निगडित संस्थेच्या वतीने २० डिसेंबर रोजी संस्थेच्या सभागृहात द. ल. वैद्य मार्ग दादर येथे शोकसभेचे आयोजन केले असल्याचे प्रमुख विश्वस्त रवींद्र आवटी यांनी सांगितले.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ५९ सन २०२२-२३**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो. ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना दिनांक १३/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २०/१२ /२०२२ रोजी १८.०० वाजे पर्यंत www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक २१/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक २१/१२/२०२२ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वीर टोळ आंबेत रा.मा. १०० कि.मी. १/८०० ते २/०० मध्ये क्रॅश बॅरिअर बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | ९८२४०० | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | म्हसळा येथील शासकिय विश्राम गृहाची विशेष दुरूस्ती करणे. (छत, प्लास्टर रंग काम, पाणी आणि सॅनिटरी व इतर) (कंपाऊड वॉलची दुरुस्ती) तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (२०५९ इमारत दुरूस्ती) | ८१८३२९ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | म्हसळा येथील शासकिय विश्राम गृहाची विशेष दुरूस्ती करणे. (छत, प्लास्टर, रंग काम, व इतर) (फरशीची दुरुस्ती) तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. (२०५९ इमारत दुरूस्ती) | ७९२७१८ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | माणगांव येथील शासकिय विश्राम गृहाची विशेष दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (२०५९ इमारत दुरूस्ती) | ९७८४६४ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | गोरेगांव येथील शासकिय विश्राम गृहाची विशेष दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (२०५९ इमारत दुरूस्ती) | ९६१७६४ | १०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | औद्योगिक प्रशिक्षिण संस्था तळाची विशेष दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (२०५९ इमारत दुरूस्ती) | ९९९३९० | १०००० | ५९२/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | बिरवाडी वाळण सांदोशी रस्ता रामा-१०२ कि.मी. १९/३०० मध्ये मोठया पुलाचे बांधकाम करणे. ( ट्रायल बोअर करणे.) तालुका महाड, जिल्हा रायगड.. (पुरहानी दुरुस्ती) | २५८३३५ | ३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |
| ८ | म्हाप्रळ आंबेत पुरार रस्ता रामा-१०१ कि.मी. ०/८०० सावित्री खाडीवरील मोठया पुलाची दुरुस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (चाचणी रेंधे) (आकस्मीत निधी) | ४५६७६१ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्रजिमा-६५ कि.मी. १३/५०० मधील लहान पुलाची दुरुस्ती करणे. ( ट्रायल बोअर करणे.) तालुका महाड, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरुस्ती) | २५१९१० | ३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |
| १० | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्रजिमा-६५ कि.मी. १३/१०० मधील लहान पुलाची दुरुस्ती करणे. ( ट्रायल बोअर करणे.) तालुका महाड, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरुस्ती) | २२७६७२ | ३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |
| ११ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्रजिमा-६५ कि.मी. १३/८०० मधील लहान पुलाची दुरुस्ती करणे. (ट्रायल बोअर करणे.) तालुका महाड, जिल्हा रायगड. (पुरहानी दुरुस्ती) | २९६५९० | ३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |

**टिप :-** १) तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५०९९**
**दिनांक : ०६/१२/२०२२**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/कोवि/२०२२-२०२३/१८७**

## एटीएम कार्डची अदलाबदल करून फसवणूक

# आंतरराज्यीय टोळी पोलिसांकडून गजाआड





**पनवेल : वार्ताहर**

पनवेलसह नवी मुंबई परिसरात एटीएममध्ये जाणाऱ्या नागरिकांना बोलण्यात गुंतवून ठेवून त्यांचे एटीएम कार्डची अदलाबदल करून फसवणूक करण्याचे प्रमाण वाढले होते. या संदर्भात तळोजा पोलिसांनी या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेतले आहे.

एटीएम कार्डची अदलाबदल करून फसवणूक करण्याचे प्रमाण वाढल्याने पोलिसांनी तपास सुरू केला होता. तळोजा पोलीस ठाणे येथे २०२२मध्ये एटीएम कार्डची अदलाबदली करून फसवणूक झाल्याचे एकूण तीन गुन्हे दाखल असून गुन्ह्यांच्या तपासादरम्यान घटनास्थळांवरील संशयितांचे सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली. गुन्हे करताना वापरलेल्या वाहनाचे प्रकार, गुन्ह्यांचे ठिकाण, आरोपींचे वर्णन यांचे तपशिलवार वर्गीकरण करून तपास करून गुन्हेगारांची माहिती प्राप्त केली. दरम्यान ३ डिसेंबर रोजी तळोजा पोलीस ठाणे हद्दीत गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या एका ऑटोरिक्षेचा पाठलाग केला व तीन संशयितांना ताब्यात घेतले. संशयितांचे चौकशीदरम्यान त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने संशय वाढला.

आरोपीची कसून तपासणी केली असता, गणेश लोंडते (वय २४ उल्हासनगर), अजय यादव (वय २५ उल्हासनगर) व विकी पिल्ले (वय २८ अंबरनाथ) यांच्याकडून वेगवेगळ्या बँकांचे ९७ एटीएम कार्ड सापडले, तसेच त्यांनी नवी मुंबई, ठाणे, रायगड, पुणे रत्नागिरी व लातूर हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. आरोपींनी गुन्हे करण्याकरीता रिक्षा वापरली असून तळोजा पोलिसांनी ही रिक्षा हस्तगत केली आहे, तसेच ९७ एटीएम कार्ड, मोबाईल फोन व १२ हजार रोख असा सुमारे एक लाख २२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) दत्तात्रय किंद्रे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र पाटील, पोलीस हवालदार दिपक पाटील, विजय पाटील, गुरुनाथ मुंडेरे, पोलीस नाईक हरिदास करडे व शिपाई संदेश उतेकर यांनी केली.

## पनवेल महापालिकेच्या स्वच्छता स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने स्वच्छ भारत अभियानांतर्गत गुरुवारी (दि. ८) स्वच्छता स्पर्धा आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहांमध्ये घेण्यात आल्या. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिंगल स्पर्धा, शॉर्ट फिल्म, पथनाट्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.

या वेळी सहायक आयुक्त डॉ. वैभव विधाते, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, स्पर्धेचे परिक्षण करण्याकरिता प्रसिद्ध अभिनेते निर्माते, दिग्दर्शक प्रदिप गोगटे, अभिनेते विजय पवार, चित्रकला शिक्षक मोहम्मद शेख, चित्रकला शिक्षक किर्तीराज साबणे उपस्थित होते.

जिंगल स्पर्धेत १२, पोस्टर स्पर्धेत ५८, शॉर्टफिल्म ११, पथनाट्य नऊ, भित्तीचित्रे तीन अशा प्रवेशिका आल्या होत्या. या सर्व स्पर्धांसाठी सिंगल युज प्लास्टिक बंदी, होम कंपोस्टींग, हवेची गणवत्ता सुधारणा, ३ आर (रिड्युस, रियुज, रिसायकल) चे महत्त्व, कचऱ्याचे चार प्रकारांमध्ये वर्गीकरण करणे असे विषय देण्यात आले होते.

स्पर्धकांचा उत्साह पथनाट्य स्पर्धेमध्ये पहायला मिळाला. शाळांच्या विद्यार्थ्यांनी तसेच नागरिकांनी वेगवेगळ्या प्रापर्टीज तसेच क्लॅप बॉक्स यांचा खुबीने वापर करत पथनाट्य सादर केलेत. आपल्या जगण्यातील रोजच्या व्यवहारातील उदाहरणे घेऊन प्लास्टिकचे होणारे तोटे, कचऱ्याचे वर्गीकरण, कंपोस्ट खत तयार करणे अशा प्रसंगाचे सादरीकरण उत्तम प्रकारे केले. सर्वच स्पर्धकांनी चुरशीने आपआपले सादरीकरण केले. यानंतर परिक्षकांनी भित्तीचित्रांचे परिक्षण केले. इ. पहिली ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवरची सुंदर चित्रे रेखाटली होती. येत्या काही दिवसांत भव्य दिव्य कार्यक्रमामध्ये या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.



# जीवनात यशस्वी होण्यासाठी वक्तृत्व महत्त्वाचे

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी विविध क्षेत्रांमध्ये काम केले आहे. म्हणून त्यांचे मार्गदर्शन हे आदर्श देणारे असल्याचे सांगत जीवनामध्ये यशस्वी होण्याकरिता वक्तृत्व महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन रयतचे मॅनजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वक्तृत्व व निबंध स्पर्धेच्या उद्घाटनावेळी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यलयात संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर प्रमुख उपस्थितीत आणि प्रसिद्ध वक्ते व शिवव्यख्याते प्रशांत देशमुख यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ९) झाले.

या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन आमदार बाळाराम पाटील, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, जे. एम. म्हात्रे, 'रयत'चे रायगड विभागीय निरीक्षक रोहिदास ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.





**पनवेल : गव्हाण कोपर येथील तानाजी जनार्दन देशमुख यांच्या नवीन घराचा वास्तूशांती आणि गृहप्रवेश सोहळा शुक्रवारी झाला. त्यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देत देशमुख यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, उपसरपंच विजय घरत, सुधीर ठाकूर, विश्वास देशमुख, शिवाजी देशमुख, राजेंद्र देशमुख, अनिल देशमुख, कमलाकर देशमुख आदी उपस्थित होते.**

## आमदार महेश बालदी मित्र मंडळातर्फे भक्तांसाठी प्रसाद व्यवस्था

**उरण : वार्ताहर**

श्री दत्त जयंतीनिमित्त उरण शहरात मोठी यात्रा भरली होती. त्यानिमित्ताने आमदार महेश बालदी मित्र मंडळाच्या वतीने दर्शनास आलेल्या भक्तांसाठी आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत देऊळवाडी येथील दत्तमंदिर परिसरात प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

या वेळी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, उरण तालुका भाजप अध्यक्ष रवी भोईर, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक कौशीक शाह, नगरसेविका प्रियांका पाटील, मदन कोळी, राजेश कोळी, देऊळ वाडी मित्र मंडळ, युवक मंडळ, सामाजिक कार्यकर्ते निरंजन नार्वेकर, आमदार महेश बालदी मित्र मंडळाचे सर्व सदस्य, हितेश शाह, मननशेठ पटेल, हस्तीमल मेहता, अजित भिडे, नगरसेवक राजू ठाकूर, मनोहर सहतिया आदी उपस्थित होते.



## किशोर बागडे यांची जनकल्याण बँकेच्या उपाध्यक्षपदी निवड



**पनवेल : वार्ताहर**

जनकल्याण सहकारी बँक लिमिटेडच्या संचालक तसेच उपाध्यक्षपदी किशोर बागडे यांची निवड झाल्याने शुक्रवारी (दि. ९) त्यांचा विशेष सत्कार पनवेल शाखेत करण्यात आला.

पनवेल शाखेच्या वतीने शाखाधिकारी महेश कांबळे, महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका रूचिता लोंढे, उद्योजक राजेंद्र बोरा, पत्रकार संजय कदम, उद्योजक इंदर सिंग चुंडावत, महेंद्र पुरोहित यांच्या वतीने शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. या वेळी मुख्य कार्यालयातून आलेले मिलिंद घोसाळकर, अमृता बेंद्रे, उमेश बुगडे आणि पनवेल शाखेतील कर्मचारी व सभासद उपस्थित होते.

# रायगड विभागीय विज्ञान प्रदर्शनात गव्हाण विद्यालयाचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या ८२व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कृतज्ञता सप्ताहांतर्गत कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये रायगड विभागाचे विभागीय विज्ञान प्रदर्शन झाले. या प्रदर्शनामध्ये संस्थेच्या श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला ऊर्जा बचत सयंत्र या उपकरणास उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

संस्थेच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर यांच्या हस्ते हे पारितोषिक देण्यात आले. या वेळी 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. गणेश ठाकूर, लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, लाईफ वर्कर प्रा.बोरगावे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल मुख्याध्यापिका अर्चना चव्हाण, विभागीय कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी बी. डी. कारंडे,विभागीय कार्यालयाचे कार्यालयीन प्रमुख एस. एन. गुजर आदी उपस्थित होते.

शिवांजली घरत, आर्या पाटील आणि विज्ञान शिक्षिका चित्रलेखा पाटील यांनी हे पारितोषिक स्वीकारले. या उपकरणास पारितोषिक मिळाल्याबद्दल विद्यार्थिनी शिवांजली खरात व आर्या पाटील यांचे व उपकरण तयार करण्यास मार्गदर्शन करणारे अटल टिंकरिंग प्रयोगशाळेचे प्रमुख तथा विज्ञान अध्यापक 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर यांचे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे,उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, ज्युनिअर कॉलेज प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे आदींनी अभिनंदन केले.

## देविदास पाटील यांना बेस्ट शिक्षक पुरस्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिखले येथील विजय आर्मी स्कूलचे उपक्रमशील शिक्षक देविदास तुळशीराम पाटील यांना बेस्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. त्याबद्दल देविदास पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सैनिक निर्देशक प्रभाकर पाटील यांनाही बेस्ट सुभेदार पुरस्काराने गौरव करण्यात आला. सीडीआर कृष्णन कमांडंट व्हीएएस यांच्या मार्गदर्शनाने व नियोजनाने कै. अमल कुमार मुखर्जी यांच्या स्मरणार्थ जेयूएए ट्रस्ट यांच्यामार्फत हे पारितोषिक देण्यात आले. १२वीत प्रथम आलेला पियुष संतोष म्हात्रे, १०वीत प्रथम आलेला विकास गावित, ८वीत प्रथम आलेला कुणाल दशरथ या विद्यार्थ्यांनाही ५००० रुपये रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

## श्री साईनाथ मंदिराचा वर्धापन दिन सोहळा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

केगाव-दांडा येथील श्री साईबाबा मंदिराचा १४वा वर्धापन दिन सोहळा नुकताच उत्साहात झाल्याची माहिती मुख्य विश्वस्त दामोदर दंडाश्री रेड्डी यांनी दिली.



सायंकाळी श्री सत्यनारायण महापूजा करण्यात आली. महिलांनी डोक्यावर कळस घेऊन, पुजेभोवती प्रदक्षिणा घातली. साईभक्त तथा उद्योजक प्रशांत म्हात्रे यांनी पालखी साई मंदिरास अर्पण केली. दांडा गावात पालखी फिरविण्यात आली. या कार्यक्रमास हिराबाई दामोदर रेड्डी, केगाव-दांडा ग्रामस्थ मंडळ, ओम साई भजन मंडळ, निकिता डेकोरेटर्स, येशिदेव बेंजो पथक, दांडा ग्रामस्थ आदींचे सहकार्य लाभले.







**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये वक्तृत्व स्पर्धा झाली. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ 'रयत'चे माजी सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी रयतचे विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर, श्री. बोरगावे, विश्वास कोरडे, बाळासाहेब कोरडे, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, अर्चना चव्हाण आदी उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)

## दिघाटी ग्रामपंचायतीमधील सर्व सदस्य बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील दिघाटी ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्व सात सदस्य बिनविरोध विजयी झाले आहेत. आता केवळ थेट सरपंचपदासाठी औपचारिक लढत होईल.

ग्रामपंचायत निवडणुकीसाठी अर्ज माघार घेण्याच्या दिवशी सर्व ठिकाणच्या लढतींचे चित्र स्पष्ट झाले. दिघाटी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ग्रामस्थांनी एकत्र येत सात सदस्य बिनविरोध करण्याचे ठरविले. त्यानुसार सात उमेदवारांव्यतिरिक्त कोणीही अर्ज सादर केला नाही. त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यपदी प्रभाग क्रमांक १मधून शितल शाम पाटील, मालती सुरेश पाटील, लक्ष्मण नामदेव ठाकूर, प्रभाग क्रमांक २मधून अमित चांगाजी पाटील, नयना विशाल म्हात्रे, प्रभाग क्रमांक ३मधून मयुरी महेश गावंड व सुनील बामा गावंड असे सर्व सात उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. सर्व विजयी शिलेदारांचे ग्रामस्थांकडून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

दिघाटी ग्रामस्थांनी पक्षभेद विसरून थेट सरपंचपदासाठीची निवडणूकही बिनविरोध करण्याचे ठरविले होते, मात्र सुनिता दयानंद ठाकूर यांनी अपक्ष अर्ज भरल्याने सरपंचपदासाठी निवडणूक होत आहे. ग्रामस्थ मंडळाच्या वतीने रजनी हिरामण ठाकूर सरपंचपदाच्या उमेदवार आहेत. ग्रामस्थांच्या आशीवार्दाने व सहकार्याने रजनी ठाकूर विजयी होतील याची केवळ औपचारिकता बाकी आहे.

## संपादकीय

# तापमानवाढीचा धोका

जागतिक तापमान वाढीचा मोठा फटका भारताला आणि भारतीय उपखंडातील अन्य देशांना बसण्याची शक्यता आहे याचा उच्चार यापूर्वीही आंतरराष्ट्रीय स्तरावरील हवामानविषयक संस्था-संघटनांकडून करण्यात आला आहे. यातच आता भर पडली आहे ती जागतिक बँकेने दिलेल्या ताज्या इशाऱ्याची. येत्या काही वर्षांत भारतात वारंवार अधिक काळ टिकणाऱ्या उष्णतेच्या लाटा येतील. भारतातील तापमान सहन करण्याच्या पलिकडची पातळी गाठेल, ज्याने काही मूठभर लोक वगळता बहुतेकांचे जिणे मुश्किल होईल. या अतितीव्र उष्म्यामुळे लाखो लोकांच्या उत्पन्नांच्या साधनांवर परिणाम होऊन देशाला कोट्यवधी डॉलरचे नुकसान सहन करावे लागेल, असा हा इशारा आहे.

**जागतिक बँकेने भारताला दिलेल्या तापमानवाढीच्या इशाऱ्यातील ठळकपणे लक्षात घेण्याची बाब म्हणजे ही भयावह परिस्थिती कित्येक वर्षांनी नव्हे तर २०३०पासून देखील ओढवू शकते. जागतिक तापमान वाढीचे भयावह परिणाम आपल्या किती समीप येऊन ठेपले आहेत एवढे हा इशारा निश्चितच अधोरेखित करतो. आपण अन्य बाबींमध्ये मश्गुल राहून कदाचित या अशा इशाऱ्यांना गांभीर्याने न घेण्याची बेदरकारी दाखवू शकतो, पण ही भाकिते खरी ठरल्यास आपल्यासाठी खूपच उशीर झालेला असेल. केरळ सरकार आणि जागतिक बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इंडिया क्लायमेट अँड डेव्हलपमेंट पार्टनर्स मीट' या परिषदेत हा अहवाल सादर करण्यात आला आहे. अशा तऱ्हेचा हा काही पहिला इशारा नव्हे. 'इंटर गव्हर्मेंट पॅनेल ऑन क्लायमेट चेंज'ने (आयपीसीसी) ऑगस्ट २०२१मध्ये हाच धोका अधोरेखित केला होता. येत्या दशकात भारतात अतितीव्र उष्ण लाटा वरचेवर येण्याची भीती आयपीसीसीनेही नमूद केली होती, तर जी-२० क्लायमेट रिस्क टलसने कार्बन उत्सर्जनाचा स्तर असाच अधिक राहिल्यास २०३६पासून भारतात उष्णतेच्या लाटा २५ पट अधिक काळ टिकून राहतील, असा गंभीर इशारा दिला आहे. भारतात ३८ कोटी लोक थेट उन्हाच्या संपर्कात येणारे कामकाज करतात. या लोकांना या अतितीव्र उष्म्याची सर्वाधिक झळ पोहोचू शकेल. यात शेती क्षेत्राचा समावेश होतो. अतिरिक्त उष्म्याचा पिकांवर काय परिणाम होऊ शकतो ते या वर्षीच आपण घटलेल्या गव्हाच्या पिकासंदर्भात अनुभवले आहे. अन्य क्षेत्रांतील नोकऱ्यांवरही या तापमानवाढीचा थेट परिणाम संभवतो. ताज्या अन्न उत्पादनावरही याचे भीषण परिणाम संभवतात याचा उल्लेख वेळोवेळी केला जातो आहे. तापमानवाढीमुळे देशातील शीतसाखळीवर परिणाम झाल्यास ताज्या अन्न उत्पादनासह वैद्यकीय उत्पादनांवरही परिणाम होऊ शकेल. आजच्या घडीला देशातील केवळ आठ-दहा टक्के कुटुंबांकडे एअर कंडिशनिंगची सुविधा आहे. ४० टक्के कुटुंबांकडे पंखे, कुलर आहेत. याचा अर्थ जवळपास निम्मी लोकसंख्या अतितीव्र उष्म्यापासून स्वत:चा बचाव करण्यासंदर्भात अतिशय भयावह परिस्थितीला सामोरी जाईल. तापमानवाढीच्या या इशाऱ्यांसोबतच बदलत्या जागतिक हवामानाच्या झळा अन्य स्वरुपातही भारताला जाणवत आहेत. देशातील मान्सूनचे स्वरुप लक्षणीयरित्या बदलले असल्याचे अनेक अहवाल अधोरेखित करीत आहेत. त्यामुळेच पावसाळ्याच्या दिवसांत अनेक भागांना नव्याने पुराचा तडाखा बसताना दिसला आहे. उत्तरेकडील राज्ये हिमनद्या वितळून येणारे पूर, भूस्खलन यांचा तडाखा अनुभवत आहेत, तर पश्चिमी किनारपट्टीला पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात चक्रीवादळांचा सामना करावा लागत आहे. जागतिक हवामान बदलाचे संकट खूपच समीप आल्याचे इशारे यापुढे निश्चितपणे दुर्लक्षित करता येणार नाहीत.**

# आधुनिक महाराष्ट्राचा विकासमार्ग : समृद्धी महामार्ग

कोणत्याही भागाचा विकास हा स्थानिक ठिकाणी दळण-वळणाची साधने किती चांगल्या दर्जाची आहेत यावर ठरतो. त्यामुळे राज्याच्या विकासासाठी रस्ते विकासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. राज्यातील रस्त्यांचे जाळे विकसित झाले, तर आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे हे ओळखून महाराष्ट्र शासनाच्या अथक प्रयत्नानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ११ डिसेंबर रोजी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होत आहे... यानिमित्त हा विशेष लेख.



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या पहिल्या टप्प्यातील नागपूर ते शिर्डी (कोकमठाण) या ५२० किलोमीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे, तर उर्वरित शिर्डी ते मुंबई हा रस्ता जुलै २०२३पर्यंत खुला करण्यात येणार आहे. या महामार्गामध्ये राज्यातील १० जिल्हे, २६ तालुके आणि ३९२ गावांचा समावेश असून सहापदरी असलेल्या या महामार्गाची लांबी ७०१ किलोमीटर आहे. या महामार्गामुळे १८ तासांचा नागपूर ते मुंबई हा प्रवास आता फक्त आठ तासांत करता येणार आहे. नागपूर ते शिर्डी हे अंतर पार करण्यासाठी पूर्वी १३ तास लागत होते. आता हे अंतर पाच तासांत पार करणे शक्य होणार आहे, तर मुंबई ते औरंगाबाद या प्रवासाचाही वेळ कमी होणार आहे.

**घोषणा ते पूर्तता**

नागपूर व मुंबई प्रवास सोयीचा व्हावा यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ३१ ऑगस्ट २०१५ रोजी नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग तयार करणार अशी घोषणा केली होती. ३० नोव्हेंबर २०१५ रोजीच्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीमध्ये हा महामार्ग तयार करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री तथा तत्कालीन नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कार्यवाही सुरू झाली. या यंत्रणेने या कालावधीत गतिमान पद्धतीने केलेले काम निश्चितच गौरवास्पद आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत ५५ हजार ३३५ कोटी रुपये आहे. या महामार्गांतर्गत एकूण १९०१ कामांपैकी १७८७ कामे पूर्ण झाली असून ११४ कामे प्रगतीपथावर आहेत.

**वेळेची बचत आणि विकासाचा राजमार्ग**

या महामार्गाच्या दोन्ही बाजूला राहणाऱ्या जनतेच्या जीवनात यामुळे मोठे परिवर्तन घडणार आहे. या प्रकल्पासाठी भूसंपादन एक वर्षाच्या विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले. या रस्त्यामुळे रोजगाराची संधी निर्माण होऊन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा राजमार्ग निर्माण होण्यास मदत होईल. प्रवाशांच्या आरामासाठी द्रुतगती महामार्गालगत २० ठिकाणी सुविधा केंद्रे तयार करण्यात आली आहेत. या रस्त्यांमुळे प्रादेशिक बाजारपेठेत वाढ होऊन शेतमालाची जलद वाहतूक होण्यास मदत होईल. या भागातील उद्योग आणि उत्पादन केंद्रांची क्षमता वाढेल.



**हरित महामार्ग**

या परिसरातील वन्यजीवांना हानी पोहचू नये यासाठी १०० वन्यजीव मार्ग तयार करण्यात आले आहेत. वन्यजीवांच्या वावरासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या ठिकाणी ध्वनिरोधकाची सोय करण्यात आली आहे. एक हजारांहून अधिक कृत्रिम शेततळ्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या रस्त्यालगत ११ लाखांहून अधिक झाडे आणि जवळपास २२ लाखांहून अधिक झुडपे व वेलींचे रोपण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन होण्यास मदत होईल. प्रवास करताना कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये तसेच अपघात झाला, तर तत्काळ मदत मिळावी यासाठी १५ वाहतूक साहाय्य केंद्र, बचाव व दुर्घटना नियंत्रणासाठी २१ जलद प्रतिसाद वाहने आणि लाईफ सपोर्ट सिस्टिमसह २१ रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या जातील.

वाहनांना तत्काळ इंधन मिळावे यासाठी देखील खबरदारी घेण्यात आली आहे. १३८.४७ मेगावॅट सौरऊर्जा तयार केली जाईल, २२ जिल्ह्यांना गॅस उपलब्धतेची निश्चिती, वाहन चार्जिंग स्टेशनमुळे ऊर्जा बचत होण्यास मदत होईल. वाहनांना टोल आकारणीसाठी 'फास्ट टॅग' प्लाझा निर्माण करण्यात येणार आहे. या प्रवासी वाहतुकीमध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणींशिवाय सुरक्षित व सुखकर प्रवास व्हावा यासाठी सर्व सोयी सुविधा निर्माण केलेल्या आहेत. दक्षिण कोरिया सरकारशी झालेल्या करारानुसार या मार्गावर अत्याधुनिक इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम पुढील दोन वर्षात द्विपक्षीय निधीद्वारे स्थापित करण्याची योजना आहे. ज्यामुळे या महामार्गावरील वाहतुकीला देखील शिस्त लावता येईल.

**पाच लाख लोकांना रोजगार**

'कृषी समृद्धी केंद्र' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन शहरांची उभारणी या मार्गावर केली जात आहे. अशा नवीन शहरांच्या विकासासाठी १८ स्थळे ठरवलेली आहेत. या ठिकाणी कौशल्य विकास केंद्र, अत्याधुनिक आरोग्य सुविधा, शैक्षणिक संस्था आणि आयटी पार्क उभारण्यात येणार आहेत. या शहरांमध्ये उभारण्यात आलेले कृषी आधारित उद्योग शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न वाढवण्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार आणि इतर संधी उपलब्ध करून देतील. या महामार्गामुळे सुमारे पाच लाख लोकांना रोजगार मिळेल अशी अपेक्षा आहे.

**पर्यटनाला मिळणार चालना**

हा महामार्ग शिर्डी, वेरुळ, लोणार सरोवर, अजिंठा, औरंगाबाद, त्र्यंबकेश्वरचे ज्योतिर्लिंग आणि घृष्णेश्वर, नाशिक, इगतपुरी इत्यादी विविध पर्यटनस्थळांना जोडत असल्याने पर्यटनाला चालना मिळेल. दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वे आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टच्या माध्यमातूनही मालाची जलद वाहतूक करण्यास सुलभ होईल. भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या कार्यकाळात सुवर्ण चतुष्कोनची भूमिका मांडली. त्यानुसार मुंबई, दिल्ली, चेन्नई, कोलकोता ही शहरे चौपदरी महामार्गांनी जोडली गेली आहेत. त्याचेच दृश्य परिणाम आज पहावयास मिळत आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही जिल्हे जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा त्याचाच एक भाग.


राज्यात कार्यक्षम, सुरक्षित, वेळेची बचत करणारी, सर्वांना परवडणारी व सर्वांसाठीची अशी उत्तम दर्जाची वाहतूक व्यवस्था असणे ही काळाची गरज आहे. बदलत्या काळात महाराष्ट्राला वेगवान प्रगतीसाठी राज्यातील जिल्हे जोडणारी, उत्कृष्ट दर्जाची वेगवान वाहतूक व्यवस्था करण्यासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग मोलाची कामगिरी बजावेल. गतिमान रस्ते विकासातून राज्याच्या विकासाचे शासनाने उचललेले हे पाऊल खूपच आश्वासक आहे. हा महामार्ग विकासाचा मार्ग ठरेल, या महामार्गालगत राहणाऱ्या जनतेच्या जीवनात थेट परिवर्तन घडून येईल हे मात्र नक्की!

**-संध्या गरवारे खंडारे,**
**सहायक संचालक**

## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सअॅपवर नवे फिचर, चॅट होणार आणखी मजेदार

अलीकडे व्हॉट्सअॅपने अनेक फीचर्स लॉंच केले आहेत. ग्रुपमधील सदस्यांची क्षमता हजारावर वाढवण्यात आली आहे. कम्युनिटी फीचर, व्हिडिओ कॉलिंगमधील सदस्यांची वाढ या काही नवीन सोयी देण्यात आल्या आहेत तसेच एकापेक्षा अधिक फोनवर एकच खाते उघडण्याचे वैशिष्टयदेखील उपलब्ध करण्यात आले आहे. आता व्हॉट्सअॅपने आणखी नवा फीचर जारी केला आहे.



व्हॉट्सअॅपचे नवीन फीचर फेसबुक मेसेंजरप्रमाणे प्रोफाइल पिक्चर दाखवते. हे पिक्चर तेच लोक बघू शकतात जे त्यांच्यासोबत मेसेज ग्रुपमध्ये आहेत. सध्या हे फीचर काही मोजक्या आयओएस युजर्ससाठी जारी करण्यात आले आहे. यापूर्वी कोणत्याही व्हॉट्सअॅप चॅटमध्ये मेसेज पाठवल्यास केवळ नाव आणि त्या खालील मेसेज दिसून यायचा, मात्र नवीन फीचरद्वारे आता युजरला ग्रुप चॅटमध्ये मेसेज पाठवणाऱ्या सदस्याचे प्रोफाइल पिक्चरदेखील पाहता येईल.

व्हॉट्सअॅपवर नवे अवतार फीचर रोल आऊट करण्यात आले आहे. या फीचरचा वापर करून युजर्सना ईमोजीप्रमाणे अवतार शेअर करता येणार आहे. तुम्हाला एखादा मेसेज पाहून काय वाटले यासाठी 'अवतार' शेअर करून व्यक्त होऊ शकता. याआधी हे फीचर फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर उपलब्ध होते, आता हे व्हॉट्सअॅपवरही उपलब्ध झाले आहे. हे फीचर कसे वापरायचे जाणून घ्या.

* व्हॉटसअॅप उघडून त्यामध्ये स्टिकर्स पर्याय निवडा. आयफोनमध्ये हा पर्याय चॅटबॉक्सवरच उपलब्ध असेल.
* अँड्रॉइडमध्ये इमोजी आयकॉनवर क्लिक करा. त्यामध्ये सर्वात खाली जीआयएफ पर्याया शेजारी तुम्हाला स्टीकर्स पर्याय दिसेल.
* जर तुम्ही पहिल्यांदा हा पर्याय निवडला तर तुम्हाला अवतार क्रिएट करावा लागेल. यासाठी 'गेट स्टारटेड' या पर्यायावर क्लिक करा.
* यानंतर तुमच्या त्वचेचा रंग, केसांचा प्रकार, डोळे, चेहरा यांची निवड करा.
* एकदा तुमचा अवतार निवडून झाल्यानंतर 'डन' पर्याय निवडा.
* व्हॉट्सअॅपवर तुम्हाला फ्रंट कॅमेरा उघडून अवतार निवडण्यासाठी मदत करण्यात येते, तुम्हाला अवतार निवडण्यात अडचण येत असेल तर हा पर्याय वापरू शकता.

# आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन

**निमित्त**

दरवर्षी १० डिसेंबरला जगभरात आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघ मानवाधिकार कार्यालयाच्या नेतृत्वात जगभरात हा दिवस साजरा केला जातो. मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने १० डिसेंबर १९४८ रोजी पॅरिस येथे स्वीकारले. त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघाने १९५० मध्ये १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिवस म्हणून जाहीर केला.

समाजातील प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित राहावे, तसेच व्यक्तीला सन्मानपूर्वक जगता यावे यासाठी १० डिसेंबर हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस म्हणून साजरा केला जातो.

मानवाधिकारांच्या घोषणापत्रात एकूण ३० कलमे असून या घोषणापत्रावर आधारित मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय विधेयक १९६६मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत मांडण्यात आले. १९७६मध्ये पुरेशा सदस्य राष्ट्रांच्या पाठिंब्यानंतर त्याला आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले. सर्वात प्रथम जगातील ४८ देशांनी हा दिवस साजरा केला.

भारतात २८ सप्टेंबर १९९३ रोजी मानवी हक्क कायदा लागू करण्यात आला. त्यानंतर १२ ऑक्टोबर १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. हा आयोग राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक या कार्यक्षेत्रांतही लागू करण्यात आला.



मानवी हक्क म्हणजे सर्व मनुष्याला प्राप्त झालेले असे मूलभूत अधिकार, जे त्याच्या राष्ट्रीयत्व, निवास, लिंग, जात, वर्ण, धर्म, भाषा किंवा इतर कोणत्याही स्थितीवर अवलंबून नसते. यामध्ये कुठल्याही प्रकाराचा भेदभाव नसतो.

मूलभूत मानवी हक्क कोणते?

१. अभिव्यक्ती स्वातंत्र्य

२. मतदान करण्याचा तसेच निवडणूक लढवण्याचा अधिकार

३.प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य आणि सुरक्षेचा अधिकार

४. शिक्षणाचा अधिकार

५. कायद्यासमोर समानतेचा अधिकार

अशा प्रकारचे एकूण २५ अधिकार आपल्याला मुलभूत मानवी हक्कांद्वारे प्राप्त झालेले आहेत.

मुळात मानवी स्वभाव हा व्यक्तिसापेक्ष बदलत जातो. व्यक्तिसापेक्ष राहणीमान, हावभाव, आवडी या बदलत जातात आणि आपल्या आवडीनुसार राहण्याचा अधिकार प्रत्येक मानवाला आहे आणि त्या आवडींचा आदर करणे हे इतर नागरिकांचं कर्तव्य! जर मानवी हक्कांची पाळंमुळं आपल्याला खोलवर रुजवायची असतील, तर तसे संस्कार हे प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये असायला हवेत. याची सुरुवात ही कुटूंब, शाळा, महाविद्यालय या सामाजिक संस्थांमधून व्हायला हवी. या संस्कारांशिवाय 'सुजाण नागरिक' ही संकल्पना अपूर्ण आहे.

सामान्य नागरिकांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होऊ नये यासाठी विविध संस्था, संघटना जागरूक बनल्या आहेत. समाजातील वेगवेगळ्या उपेक्षित गटांना आणि घटकांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळण्यासाठी अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे आता मानवी हक्क चळवळीपुरते मर्यादितच राहिले नसून ती एक वेगळी ज्ञानशाखाही झाली आहे. आव्हानात्मक करिअर करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींना या क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत.

**क्लिक...क्लिक...!**





**अलिबाग : कोरोनाच्या दोन वर्षांनंतर यंदा चौल भोवाळे येथे श्री दत्त जयंतीनिमित्त यात्रा भरली आहे.** (छाया : हर्षल मोरे)

## आरोग्य प्रहर

# थंडीत ओठांचा कोरडेपणा कमी करण्यासाठी 'हे' करा

थंडीचं आणि ओठ कोरडे पडण्याचं किंवा ओठ फुटण्याचं नातंच आहे. रात्रीच्या वेळी आणि सकाळी घरातून बाहेर जाताना लिप बाम लावला तरीही ओठ फुटतातच, असा खूप जणांचा अनुभव असतो, पण याचाच अर्थ तुम्हाला केवळ रात्री आणि काळी ओठांना मॉईश्चराईझ करणं पुरेसं होत नाहीये. अशा वेळी आणखी काळजी घ्यावी लागेल. ओठ कोरडे पडू नयेत यासाठी काय करावं यासाठी 'एएडी' अर्थात 'अमेरिकन अकॅडमी ऑफ डरमॅटॉलॉजी सोसायटी'ने काही टिप्स दिल्या आहेत. त्या पाहूया.



बाजारात अनेक कंपन्यांचे लिप बाम उपलब्ध आहेत. लिप बाम लावल्यावर ओठांवर 'इरिटेशन' होत असल्यास तो वापरू नये, नाहीतर ओठांच्या त्वचेवर विपरित परिणाम होऊ शकतो. हीच गोष्ट लिपस्टिक, लिपग्लॉस या वस्तू खरेदी करतानाही तपासावी.

ओठ थंडीनं कोरडे पडले असतील तर खालील घटक असलेला लिप बाम (किंवा हे घटक असलेलं कोणतंही ओठांसाठीचं उत्पादन) न वापरलेलाच चांगला-कापूर, निलगिरी तेल, लॅनोलिन, मेन्थॉल, ऑग्झीबेन्झोन, फेनॉल (फेनिल), प्रॉपिल गॅलेट, सॅलीसायलिक सिड.

बहुतेक लिप बाम किंवा लिपस्टिकमध्ये विशिष्ट फ्लेव्हर्स आणि वास वापरलेले असतात. विविध फळांच्या वासांचे, बेकिंगमध्ये वापरल्या जाणाऱ्या मोहक सुगंधांचे किंवा मसाल्यांच्या वासांचे लिप बाम मिळतात. ओठ फुटलेले असतील तर मात्र दालचिनी, संत्र वा लिंबू (सिट्रस फ्लेव्हर), पेपरमिंट हे फ्लेव्हर्स असलेले लिप बाम वापरू नका. त्यामुळेही ओठांवर इरिटेशनची भावना निर्माण होऊ शकते.

शक्यतो कोणताही फ्लेव्हर वा फ्रेगरन्स नसलेला लिप बाम वापरलेला चांगला. हीच गोष्ट लिपस्टिकबाबतही सांगता येईल. तुमची त्वचा व ओठ अधिक संवेदनशील असतील, तर उत्पादन 'हायपोलर्जेनिक'ही वापरता येईल.

लिप बाम किंवा ओठांसाठीच्या इतर उत्पादनांवर जे घटक पदार्थ लिहिलेले असतात, त्यात कोणते चांगले-वाईट घटक आहेत, याचा अंदाज यावरून येऊ शकतो.

ओठ कोरडे पडत असतील तर दिवसांत पुन्हा पुन्हा आणि रात्री झोपतानाही लिप बाम लावा.

थंडीतही दिवसभर थोड्या थोड्या वेळानं पाणी पिणं आवश्यक असतं, पण ते अनेकांच्या लक्षात येत नाही. तेव्हा ध्यानात ठेवून पाणी पीत राहायला हवं आणि पुरेसं पाणी प्यावं.

# शिरवलीत भाजपचा जोरदार प्रचार



**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील शिरवली ग्रामपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आपला प्रचार सुरू केला आहे. येथे भाजपचे मयुरेश म्हात्रे थेट सरपंचपदाची निवडणूक लढवत आहेत. जयेश अनंत म्हात्रे सदस्य पदाचे उमेदवार आहेत.

शिरवली येथील श्री भगवान शंकरचे मंदिरात प्रचाराचा नारळ फोडून ग्रामपंचायत निवडणूक प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा चिटणीस समिर राणे, तालुका ओबीसी सेल अध्यक्ष अशोक वारगे, तालुका युवा अध्यक्ष आलाप मढावी, तालुका सरचिटणीस प्रशात पाटील, कुर्डूस विभाग अध्यक्ष अमित पाटील, रामराज विभाग अध्यक्ष अजिंक्य पाटील, बामणगाव विभाग अध्यक्ष अविनाश भादानकर, बुथ प्रमुख अशिश पाटील तसेच साईनाथ म्हात्रे, दिलीप गावंड, अंकुश म्हात्रे, हर्षला म्हात्रे, निधी म्हात्रे, विश्वनाथ म्हात्रे, अंकित म्हात्रे, दर्शन म्हात्रे यांच्यासह शिरवली ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुधागडात १४ सरपंचपदासाठी २९, तर ११० सदस्यपदांसाठी १७४ उमेदवार रिंगणात

**पाली : रामप्रहर वृत्त**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सुधागड तालुक्यात सरपंचपदाचे १८ तर सदस्यपदाचे ९९ उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. त्यामुळे आता तालुक्यातील १४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी २९ तर सदस्य पदाच्या एकूण ११० जागांसाठी १७४ उमेदवार निवडणूक रिंगणात उरले आहेत.

सुधागड तालुक्यातील हातोंड, अडुळसे, खवली, घोटावडे, तिवरे, आपटवणे, शिळोशी, सिद्धेश्वर बुद्रुक, चिवे, ताडगाव, खांडपोली, आतोणे, चंदरगाव आणि माणगाव बुद्रुक या १४ ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. १४ थेट सरपंच पदासाठी ४८ तर एकूण ११० सदस्य पदासाठी २७६ उमेदवारी अर्ज सादर करण्यात आले होते. त्यापैकी सरपंचपदाचा एक व सदस्यपदाचे तीन उमेदवारी अर्ज अवैध ठरले होते. बुधवारी निर्धारित वेळेत सरपंच पदाचे १८ तर सदस्य पदाचे ९९ उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले.

# अलिबागेत तंबाखूविरोधी जनजागृतीपर प्रभातफेरी



**अलिबाग : प्रतिनिधी**

टाटा मेमोरियल हॉस्पिटल–खोपोलीतर्फे रायगड जिल्हा परिषद व जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या सहकार्याने शुक्रवारी (दि. ९) अलिबाग शहरात तंबाखूविरोधी जनजागृती करण्यात आली. या वेळी शहरात जनजागृतीपर प्रभातफेरी काढण्यात आली होती. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी फीत कापून प्रभातफेरीला सुरुवात केली. या प्रभातफेरीत विद्यार्थी, नागरिक सहभागी झाले होते.

३१ मे रोजी जागतिक तंबाखूविरोधी दिन साजरा करण्यात येतो, मात्र टाटा मेमोरिअल हॉस्पिटल माध्यमातून वर्षभर तंबाखू विरोधी जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. याच उपक्रमांचा भाग म्हणून शुक्रवारी अलिबाग शहरात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

माझं आरोग्य, माझी जबाबदारी या अंतर्गत तंबाखू जन्य पदार्थांमुळे कर्करोग होतो, तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर रहा, असे आवाहन या वेळी पथनाट्यातून करण्यात आले. जनजागृतीपर काढण्यात आलेल्या प्रभातफेरीत जेएसएम कॉलेज, पीएनपी कॉलेज, मेडिकल कॉलेज, नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच माणुसकी प्रतिष्ठान, लायन्स क्लब व इतर स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या होत्या.

अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रमोद गवई, जिल्हा उपआरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे यांच्यासह टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

> **तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनापासून दूर राहावे. टाटा मेमोरिअल हॉस्पिटलच्या माध्यमातून तंबाखू विरोधी जनजागृतीसाठी करण्यात येणारे उपक्रम स्तुत्य आहेत.**
>
> **–डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद**

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीला २० वर्ष सक्तमजुरीची शिक्षा





**अलिबाग : प्रतिनिधी**

**माणगाव सत्र न्यायालयाचा निर्णय**

हॉटेलवर काम करणाऱ्या बालकामगार मुलीवर बलात्कार करणाऱ्यास माणगाव विशेष सत्र न्यायालयाने २० वर्ष सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आणि दोन लाख ६५ हजार रुपयांचा दंडही ठोठावला. कोलाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वरसगाव (ता. रोहा) येथील रेस्टॉरंट व लॉजिंग येथे २१ फेब्रुवारी २०२२ ते २६ फेब्रुवारी २०२२ यादरम्यान ही घटना घडली होती.

नोकरीचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीला आपल्या हॉटेलमध्ये कामावर ठेवून तिच्यावर वारंवार बलात्कार केल्याप्रकरणी हॉटेल मालकावर भादवी भादवि कलम ३७६ (एन),३७६ (३), ५०६ सह पोक्सो कलम ४,६,८, अन्वये गुन्हा करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पी. एस. तायडे यांनी करुन आरोपींविरोधात माणगाव विशेष सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले होते. सदर खटल्याची सुनावणी विशेष सत्र न्यायाधिश हर्षल भालेराव यांच्या न्यायालयात झाली. या वेळी सहाय्यक सरकारी अभियोक्ता म्हणून योगेश तेंडूलकर यांनी काम पाहिले. सुनावणी दरम्यान पीडित मुलीची साक्ष, वैद्यकीय पुरावा महत्त्वाचा ठरला. दोन्ही बाजूचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सरकारी अभियोक्ता तेंडूलकर यांचा युक्तिवाद ग्राह्य धरला. आणि आरोपीला दोषी ठरवून २० वर्षे सक्तमजुरी व दोन लाख ६५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

सदर खटल्याच्या सुनावणी दरम्यान पैरवी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक, यु. एल. धुमास्कर, पोलीस हवालदार छाया कोपनर, शशिकांत कासार, व शशिकांत गोविलकर यांनी सहकार्य केले.

# खोपोलीत महिलेची सोनसाखळी लांबवली

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील लव्हजी गाव येथून डीपी रोडमार्गे मॉर्निंगवाक करणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन शुक्रवारी (दि. ९) सकाळी दुचाकीवरून आलेल्या अज्ञात इसमाने खेचून पोबारा केला.

दुचाकीवरून येऊन पादचारी महिलांच्या गळ्यातील सोन्याची चैन लांबवणाऱ्या टोळीने पुन्हा डोके वर काढले आहे. खोपोली नगर परिषद हद्दीतील लव्हजी गावामधील ग्यानती यादव (वय ५६) व त्यांचे पती निवृत्त शिक्षक दलसिंगार यादव (वय ६५) हे दररोज लव्हजी येथून डीपी रोड मार्गे शिळफाट्यापर्यंत मॉर्निंगवाक करीत असतात. नेहमीप्रमाणे त्या शुक्रवारी सकाळी ६.१५ च्या दरम्यान डीपी रोडच्या दिशेने जात असताना, आर. के. रेसिडेन्सी या इमारतीजवळ दुचाकीवरून आलेल्या अज्ञात इसमाने ग्यांनती यादव यांच्या गळ्यातील अंदाजे दीड तोळा वजनाची सोन्याची चैन खेचून तो शिळफाट्याच्या दिशेने पसार झाला.

या प्रकरणी दलसिंगार यादव यांनी खोपोली पोलिसात तक्रार दिली असून, पोलिसांनीही तपास कामाला सुरुवात केली आहे. ज्या इमारतीजवळ घटना घडली, त्या इमारतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे पोलिसांना आढळून आले आहे.

# ग्रामपंचायतींनी विकास आराखडा तयार करावा

## डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी पाणी, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण या बाबींचा अभ्यास करून परिपूर्ण असा स्वत:चा विकास आराखडा तयार करावा तसेच आपली ग्रामपंचायत आदर्श ठरण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी गुरुवारी (दि. ८) अलिबागमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांना केले.

प्लास्टिक व्यवस्थापन प्रकल्प अमलबजावणीसाठी गुरुवारी जिल्हा परिषदेच्या कै. ना. ना. पाटील सभागृहात रायगड जिल्ह्यातील निवडक सरपंच व ग्रामसेवक यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. डॉ. किरण पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपापल्या ग्रामपंचायतीत घनकचरा वर्गीकरण करून त्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा कार्यान्वित करावी. प्लास्टिक कचरा संकलन करून तो पुनर्प्रक्रिया करण्यासाठी कंपन्या तसेच इतर ठिकाणी पाठविण्यात यावा. तसेच आपली ग्रामपंचायत आदर्श होण्याच्या दृष्टीने सर्वांनी जोमाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन कामे हाती घेऊन, ग्रामपंचायतींनी लवकरच प्लास्टिक केंद्रांची, संकलन केंद्रांची उभारणी करावी, असे पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी या वेळी सांगितले. ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव या वेळी उपस्थित होते. या वेळी प्लास्टिक संकलनात काम करणाऱ्या लहाज प्रतिष्ठान, आम्ही संस्था, स्वदेश फाउंडेशन, जेएसडब्ल्यू कंपनी, ग्रीन फाउंडेशन, इकोसत्व संस्था या स्वयंसेवी संस्था व कंपन्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO e-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | **e-Tender-18/ 22-23/ RFx No. 7000025203** | AMC for work of Overhauling & Servicing of 220 KV double break Isolators under 400 KV RS (O&M) Division Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel. **2nd call…** | **Rs. 15 Lakh** | **16.12.2022 up to 23:59 Hrs** |
| 2 | **e-Tender-25/ 22-23/ RFx No. 7000025204** | AMC for work of Overhauling & Servicing of 400 KV Pantograph Isolators & Centre Break Isolators at 400 KV Substation Nagothane under 400 KV RS (O&M) Division Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel. **2nd call…** | **Rs. 10 Lakh** | **16.12.2022 up to 23:59 Hrs** |

**EMD:** 1% of Estimated Cost. **Tender Fee**: Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE), Mob. No. 9461456635 e-mail ID: **ee7230@mahatransco.in Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on **SRM E-Tenders** (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**


# अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी समीर मालोदे यांची फेरनिवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड फोटोग्राफर्स अॅड व्हिडीओग्राफर्स असोसिएशन शी सलग्न अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनची सभा नागाव बायपास मार्गावरील श्री जलाराम मंदिरात पार पडली. असोसिएशनचे खजिनदार जितेंद्र मेहता यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत मागील कार्यकारिणी बरखास्त करून नविन कार्यकारिणी स्थापन करण्यात आली. या वेळी अध्यक्षपदी समीर मालोदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



असोसिएशनच्या अन्य पदाधिकाऱ्यांचीही या वेळी निवड करण्यात आली. त्यात तुषार थळे (उपाध्यक्ष), सुदेश माळी (कार्याध्यक्ष), विकास पाटील (सचिव), विवेक पाटील (खजिनदार) यांचा समावेश आहे. तर सुरेश खडपे आणि राकेश दर्पे यांची सल्लागारपदी निवड करण्यात आली.

अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनने सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रम राबविले असून ते काम या कार्यकारणीसह पुढे नेण्यात येईल, असे मालोदे यांनी मनोगतात सांगितले.

असोसिएशनचे माजी अध्यक्ष सचिन असराणी, अमोल नाईक, सचिन म्हात्रे, अभिजित काटकर, विजय पाटील, प्रमोद कांबळी, अमर मढवी, मनोज पाटील, विराज घरत, वैभव वाणी, जयेंद्र वाघमारे, सागर सावंत, प्रणेश म्हात्रे या वेळी उपस्थित होते.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFx No. | Description | Est. Cost |
|---|---|---|
| Tend-39/22-23 **RFx No. 7000025280** | Work of SITC of IEC 61850 complied Digital communicable Distributed Architecture Based Transformer Auxiliary Monitoring System with Energy Data Acquisition System and Automatic Log Sheet Generation Module at 220kV Mahad Substation under EHV (O&M) Dn., Mahad. | Rs. 29.41 Lakh |
| Tend-52/22-23 **RFx No. 7000025255** | Work of Supply, Erection, Testing and Commissioning of 1 No. of 22kV Feeder along with Civil works on turnkey basis at 100kV Jite S/stn…**1st extn.** | Rs. 31.65 Lakh |

**EMD:** 1% of Estimated Cost. **Tender Fee**: Rs. 500/- + GST **Submission of Bids:** From 08.12.2022 to 15.12.2022 up to 23:59 Hrs **Bid Opening Date:** 16.12.2022 @ 11:00 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm), Tel. No. 022-27459624, Mob. No. 9769006220. e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer (I/C)**
**EHV (O&M) Circle, Panvel**


# खोपोली येथे श्री दत्त जयंती उत्साहात



**खालापूर : प्रतिनिधी**

श्री वासुदेवानंद सरस्वती टेम्बेस्वामी महाराज यांच्या बोरिवली आणि खोपोली येथील स्थानांवर बुधवारी (दि. ७) श्री दत्त जयंती उत्सव अतिशय उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या उत्सावात सहभागी होऊन शेकडो भक्तांनी श्रीमद वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज व सद्गुरू भाऊ महाराज करंदीकर यांचे आशीर्वाद घेतले.

श्री दत्त जयंतीनिमित्त दोन्ही स्थानांवर बुधवारी सकाळी महापूजा आणि रुद्राभिषेक केला गेला. खोपोली स्थानावर संध्याकाळी सद्गुरू भाऊ महाराज करंदीकर यांच्या ध्वनिमुद्रित आवाजात श्रीदत्त जन्माच्या अध्यायाच्या श्रवणाचा लाभ भक्तांनी घेतला. संध्याकाळी आरती झाल्यानंतर वासुदेवानंद सरस्वती टेम्बेस्वामी महाराजांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हेमंत करंदीकर यांनी महाराजांची मूर्ती पालखीमध्ये विराजमान करून पालखी सोहळ्याची सुरवात केली. या पालखी सोहळ्यात प्रसिद्ध अभिनेते जयवंत वाडकर सहभागी झाले होते.

# पेणमध्ये २५ विद्यार्थिनींना वैद्यकीय साहित्याचे वाटप

**पेण : प्रतिनिधी**

सीएफआय व इंडियाज बार्न यांच्यातर्फे सीएफआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख व ज्येष्ठ पत्रकार सूर्यकांत पाटील यांच्या हस्ते नर्सिंगचे शिक्षण घेत असलेल्या २५ विद्यार्थिनींना एप्रॉन, स्टेथोस्कोप, थर्मोमिटर इत्यादि वैद्यकीय साहित्याचे वाटप करण्यात आले. डॉ. किशोर देशमुख यांनी या वेळी उपस्थित विद्यार्थिनी व पालकांना मार्गदर्शन केले.




ओडीडी आरवायजीएच फाउंडेशन आणि इंडियाज बार्न या नॉर्वेजिअन संस्थेच्या माध्यमातून मिळालेल्या निधीमधून सदर सीएफआय प्रतिपालीत विद्यार्थिनींना सीएफआय संस्थेच्या पेण येथील कार्यालयात वैद्यकीय साहित्याचे वितरण करण्यात आले. या विद्यार्थिनी अतिशय गरीब कुटुंबातील असून त्या सीएफआयमार्फत मिळणाऱ्या मदतीच्या माध्यमातून नर्सिंगचे शिक्षण घेत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **सौ. मानसी मिलिंद भगत, पत्ता मु. ऊसर्ली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६** यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**–: मिळकतीचे वर्णन :–**

ग्रुप ग्रामपंचायत ऊसर्ली खुर्द यांचे सिमारेषेतील गावठाण हद्दीतील **अनु. क्र. ९८, मालमत्ता क्र. २०, इतर पक्के बांधकाम असलेले घर, मौजे ऊसर्ली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड** ज्याचे एकुण क्षेत्र. **५९५ चौ. फुट** हि मिळकत. वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक/ भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **कै. कृष्णा महादु भोईर (मयत ) व कै. हिरूबाई कृष्णा भोईर (मयत) तर्फे कायदेशिर वारस श्री. मनिष कृष्णा भोईर व श्री. प्रदिप कृष्णा भोईर, रा. मु. ऊसर्ली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम.ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **०७ (सात)** दिवसापर्यंत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**

**दिनांक : ९/१२/२०२२**

**सही/–**
**अॅड. अतिश सुनिल परदेशी**
**अॅड. हायकोर्ट**
गाळा नं. ७, फडके नाटयगृह कॉम्प्लेक्स,
श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड मो. ९७०२८९८९८९

## निवडक

### ज्ञानकृपा सहकारी पतपेढीत चोरी

**पनवेल :** शहरातील साईआर्केड शॉप नं. ८, येथे असलेल्या ज्ञानकृपा सहकारी पतपेढीच्या पनवेल शाखेत अज्ञात चोरट्याने चोरी करून जवळपास ८७,८८७ रुपये रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. पतपेढीच्या ऑफिसच्या खिडकीचे ग्रील वाकवून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून पतपेढीच्या टेबलचे ड्रॉवरमधील ८७ हजार ८८७ रुपये रोख रक्कम चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



### सीबीडी बेलापूर येथून तरुण बेपत्ता

**पनवेल :** सिबीडी बेलापूर येथून एक तरुण कोणास काही एक न सांगता कोठे तरी निघून गेल्याने तो हरवल्याची तक्रार सीबीडी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या तरुणाचे नाव ब्रिजेश भडाकुराम चव्हाण (वय २६) असून तो मूळ छत्तीसगडचा रहिवाशी आहे. त्याची उंची चार फूट पाच इंच, रंग सावळा, केस लांब काळे, लाल पिवळा टिशर्ट व जिन्स पॅन्ट असा पेहराव आहे. त्याला मराठी व हिंदी बोलता येते. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास सीबीडी पोलीस ठाणे किंवा पोलीस नाईक एस. एच. घोडके (मो. नं. ८७७९६२३८०९) यांच्याशी संपर्क साधा.



### दुकानातील कर्मचाऱ्याला मारहाण

**पनवेल :** दुकानाच्या ठिकाणी बियर पिऊ नका, असे सांगितल्याने त्याचा राग मनात धरून चार अनोळखी व्यक्तींपैकी एकाने तेथील दोघांना लाकडी बांबू मारून तर इतर तिघांनी हाताने मारून दोघांना जखमी केल्याची घटना करंजाडे येथे घडली आहे. जितेश बियर शॉपी या ठिकाणी अंकुश भोईर व त्याच्या साथीदाराने चार अनोळखी व्यक्तींना दुकानाच्या ठिकाणी बियर पिऊ नका असे सांगितले, मात्र त्याचा राग मनात धरून चार अनोळखी व्यक्तींपैकी एकाने तेथील त्या दोघांना लाकडी बांबू मारून तर इतर तिघांनी हाताने मारून दोघांना जखमी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### विनापरवाना विक्रीप्रकरणी कारवाई

**पनवेल :** करंजाडे वसाहतीमध्ये उघड्यावर विनापरवाना खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांवर दोघे विक्रेत्यांवर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. करंजाडे सेक्टर आर ३ या ठिकाणी उघड्यावर फ्राईड राईस विक्रीसाठी फुटपाथवर टेबल लावून त्यावर शेगडी ठेवून ते सिलेंडरच्या सहाय्याने पेटवून विक्री करणाऱ्याविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे, तसेच चायनीज भेळ विक्रीसाठी फुटपाथवर टेबल लावून त्यावर शेगडी ठेवून ते सिलेंडरच्या सहाय्याने पेटवून विक्री करणाऱ्या विरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. यामुळे अश्याप्रकारे उघड्यावर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

### एपीएमसीत स्ट्रॉबेरीची आवक वाढली

**नवी मुंबई :** अवकाळी पावसाने स्ट्रॉबेरीचा हंगाम लांबला असला तरी आता बाजारात स्ट्रॉबेरी दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. एपीएमसी बाजारात सद्य स्थितीत दोन ते अडीच हजार क्रेट दाखल होत आहेत. एपीएमसी घाऊक बाजारात दिवसागणिक स्ट्रॉबेरीची आवक वाढत असल्यामुळे त्यांचे बाजारभाव उतरलेले पहावयास मिळत आहे. मागील महिन्यात ६०० ते ८०० रुपये प्रतिकिलो मिळणारी स्ट्रॉबेरी आता ३२० ते ६०० रुपये प्रतिकिलो उपलब्ध आहे. मात्र स्ट्रॉबेरीला गोडवा कमी असून २० डिसेंबरनंतरच मधूर स्ट्रॉबेरी चाखायला मिळेल, असा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तविला आहे.

# नवी मुंबईतील कामांचा आयुक्तांकडून आढावा

## कामे विहित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या सुविधा कामांना अधिक गती द्यावी व ही कामे विहित वेळेत पूर्णत्वास येतील याची खबरदारी घ्यावी, असे निर्देश महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी कोपरखैरणे विभाग तसेच कोपरखैरणे, तुर्भे व नेरूळ भागातील एमआयडीसी क्षेत्राची पाहणी करताना अभियांत्रिकी विभागाला दिले.

या पाहणी दौऱ्यात शहर अभियंता संजय देसाई, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील, विभाग अधिकारी प्रशांत गावडे व सुखदेव येडवे, कार्यकारी अभियंता विजय राऊत, गिरीष गुमास्ते, प्रविण गाडे आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

कोपरखैरणे सेक्टर १० येथील महानगरपालिकेच्या सीबीएसई बोर्ड शाळा इमारतीची पाहणी करताना आयुक्तांनी उपक्रमशील शिक्षण (ॲक्टिव्हिटी बेस्ड लर्निंग) पद्धतीवर भर देण्याच्या सूचना केल्या. सीबीएसई शाळेला पालकांची मोठ्या प्रमाणावर पसंती मिळत असून अनेक विद्यार्थी वेटींग लिस्टवर असल्याची माहिती घेत त्यादृष्टीने शाळा इमारतीत आकर्षक बदल करून आनंददायी शिक्षणावर भर देण्याच्या सूचना आयुक्तांनी या वेळी दिल्या. शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुसकर व परिमंडळ २चे उपआयुक्त डॉ. अमरिश पटनिगिरे उपस्थित होते.

कोपरखैरणे सेक्टर १५ येथील दैनंदिन बाजार वास्तूची पाहणी करताना भेटीला आलेल्या फेरीवाल्यांच्या शिष्टमंडळाशी आयुक्तांनी सुसंवाद साधला. या एक मजली दैनंदिन बाजार इमारतीच्या तळमजल्याचे काम अंतिम टप्प्यात असून ते पंधरवड्यात पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले, तसेच त्याठिकाणी पूर्वीपासून व्यवसाय करणाऱ्या व महानगरपालिकेकडे नोंदीत असलेल्या साधारणत: २०० पैकी निम्म्या फेरीवाल्यांचे पहिल्या टप्प्यात तळमजल्यावर नियोजन करावे व उर्वरित फेरीवाल्यांना वरच्या मजल्यावरचे काम गतिमानतेने पूर्ण करून दुसऱ्या टप्प्यात जागा उपलब्ध करून द्यावी, असेही आयुक्तांनी निर्देशित केले.

कोपरखैरणे भागातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सेक्टर १८, तीन टाकी येथे ५ द. ल. लि. क्षमतेच्या भूस्तरीय जलकुंभाच्या कामाची बांधकामात खाली उतरून आयुक्तांनी पाहणी केली. एमएसईडीसीएलमार्फत जलद कनेक्शन घेऊन जलवितरणाचे टेस्टींग करावे, असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

एमआयडीसी क्षेत्रात महापालिकेच्या वतीने सुरू असलेल्या १५ किमी रस्ते काँक्रिटीकरण कामाची पाहणी कोपरखैरणे, तुर्भे ते नेरुळ एमआयडीसी परिसरात ठिकठिकाणी थांबून आयुक्तांनी केली. तुर्भे झोपडपट्टी परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने तीन भूस्तरीय व उच्चस्तरीय जलकुंभ बांधण्यात येत असून त्यातील इंदिरानगर येथील जलकुंभाच्या कामाची पाहणी करताना हे काम विहित वेळेत पूर्ण करण्याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे असे निर्देश आयुक्तांनी दिले. शिवाजीनगर नेरूळ भागातील झिरो वेस्ट स्लम मॉडेल राबविण्यासाठी तयार करण्यात आलेल्या स्ट्रक्चरची पाहणी करताना याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर सुरू करावी असेही त्यांनी सांगितले.

## गव्हाण विद्यालयात शालेय विज्ञान प्रदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शालेय विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले. सेवा संयोग फाउंडेशन पनवेल रायगडतर्फे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक मॉडेल आणि ज्ञानव रॉकेट मॉडेलबाबतची माहिती देण्यात आली.

विज्ञान प्रदर्शनास विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांकडून विविध उपकरणे व वैज्ञानिक साधनांची माहिती घेतली.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्य साधना डोईफोडे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, विज्ञान शिक्षिका चित्रलेखा पाटील व चारूशिला ठाकूर, इतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

पनवेल येथील सेवा संयोग फाउंडेशन च्या विज्ञान प्रशिक्षकांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. सेवा सहयोग फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना वैज्ञानिक मॉडेल आणि ज्ञान व रॉकेट मॉडेलबाबतची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिकांमध्ये अतिशय उत्स्फूर्त सहभाग दर्शविला. या प्रदर्शनामधील प्रतिकृतींची निवड विभागीय स्तरावरील विज्ञान प्रदर्शनामध्ये सहभागासाठी करण्यात आली.

## नवी मुंबईतील भित्तीचित्रकारांचे शंकर महादेवन यांच्याकडून कौतुक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहराविषयी येथील नागरिकांमध्ये अतिशय प्रेम व अभिमान असून भित्तीचित्र स्पर्धेच्या माध्यमातून १ली तील विद्यार्थ्यांपासून ते मोठ्या चित्रकारांपर्यंत नवी मुंबईच्या स्वच्छ व सुंदरतेच्या संकल्पना चित्रांद्वारे साकारणाऱ्या कलावंतांचे सुप्रसिद्ध गायक संगीतकार व स्वच्छ नवी मुंबई मिशनचे ब्रँड ॲम्बेसेडर शंकर महादेवन यांनी कौतुक केले.



नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील भेटीप्रसंगी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासमवेत शंकर महादेवन यांनी मुख्यालय इमारतीच्या बेसमेंटमध्ये भित्तीचित्र स्पर्धेत सहभागी ६९ विद्यार्थी, युवक, नागरिक चित्रकारांनी सहभागी होत चितारलेल्या भित्तीचित्रांची पाहणी केली व चित्रकारांच्या शहर स्वच्छतेविषयक कल्पक संकल्पनांची प्रशंसा केली.

या वेळी त्यांच्यासमवेत शहर अभियंता संजय देसाई, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे व इतर मान्यवर उपस्थित होते.

स्वच्छ सर्वेक्षण २०२३च्या अनुषंगाने नवी मुंबईतील स्वच्छता कार्यात व्यापक लोकसहभागावर भर दिला जात असून नागरिकांच्या अंगभूत कलागुणांना उत्तेजन देण्यासाठी व त्यामधून स्वच्छतेचा संदेश प्रसारित होण्यासाठी चित्रकला, भित्तीचित्र, पथनाट्य, जिंगल, शॉर्टफिल्म अशा विविध स्वच्छता स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सर्व स्पर्धांमध्ये नागरिकांचा सहभाग लाभत आहे. याबद्दलही गायक व ब्रँड ॲम्बेसेडर शंकर महादेवन यांनी कौतुक केले.

## विजय आर्मी स्कूलमध्ये डॉ. आंबेडकरांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विजय आर्मी स्कूल चिखले येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य मराठे उपस्थित होते. त्याचबरोबर शाळेचे उपप्राचार्य सोपान पाटील, पर्यवेक्षक बिराडे, अहिरे, ज्येष्ठ शिक्षक साळुंखे, सगळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावरील कविता व भाषणे सादर केली. सूत्रसंचालन नेरुळकर मॅडम यांनी केले, तर प्रास्ताविक लांबोळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार पवार मॅडम यांनी मानले.

## भाजपतर्फे उद्या कळंबोली येथे भव्य रोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त जय गोपीनाथ प्रतिष्ठान व सेग फाउंडेशन यांच्या माध्यमातून बँकिंग क्षेत्रात तरुण-तरुणींसाठी कळंबोली येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कळंबोली सेक्टर ४ येथील स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे रविवारी (दि. ११) सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा रोजगार मेळावा असणार आहे. कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा तिसऱ्या वर्षात शिकत असलेल्या तरुण-तरुणी या मेळाव्यात सहभाग घेऊ शकतात. वयोमर्यादा १९ ते २५ असून ऑनलाइन प्रशिक्षण देऊन तीन महिन्यानंतर कायमस्वरूपी बँकेत नोकरी मिळेल, याची हमी सेग फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात आलेली आहे.

अधिक माहितीसाठी बबन बारगजे (८८२८६११११९), अमोल पालवे (८६५२७४१०१६), सुभाष आंधळे (८४२२९ ४१२१२), महेश बारगजे (९६६४२५४५२९) यांच्याशी संपर्क साधावा. या सुवर्णसंधीचा सर्व तरुण तरुणींनी लाभ घ्यावा, असे आवाहन बबन बारगजे यांनी केले आहे. या मेळाव्याचे उद्घाटन कळंबोली शहर अध्यक्ष रवीनाथ पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

## बाजारात बटाट्याच्या दरात वाढ



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील महिन्यात कांद्याबरोबर बटाट्याच्या दरातही घसरण झाली होती, परंतु आता बाजारात नवीन बटाट्याची आवक सुरू झाली असून जुना बटाट्याची कमतरता भासत आहे. नवीन बटाट्याला मागणी वाढली आहे. त्यामुळे जुना बटाटा आणि नवीन बटाट्याच्या दरातही वाढ झालेली आहे.

आधी प्रति किलो १५ ते १८ रुपयांनी उपलब्ध असलेला बटाटा आता २० ते २२ रुपयांवर विक्री होत आहे. जुन्या पेक्षा नवीन बटाट्याला मागणी अधिक असल्याने नवीन बटाट्याचे दरही चढेच आहेत.

यंदाच्या हंगामात कांद्या पेक्षा बटाटे वरचढ ठरत होते. जानेवारी -फेब्रुवारीमध्ये प्रति किलो कांदा २० रुपयांच्या आत मध्ये होता तर बटाट्याने २५ ते ३० गाठली होती. मागील महिन्यात कांद्याबरोबरच बटाट्याचे दरही आटोक्यात आले होते, परंतु आता पुन्हा बटाट्याच्या दरात ४ ते ६ रुपयांची वाढ झालेली आहे. यंदा सुरुवातीला पाऊस एक महिना लांबल्याने नवीन बटाट्याची लागवड एक महिना उशिरा करण्यात आली. त्यामुळे बाजारात मागणीच्या तुलनेत बटाटा कमी दाखल होत असल्याने दर चढेच आहेत.

सध्या बाजारात उत्तर प्रदेश, इंदौर आणि तळेगाव येथून बटाटा दाखल होत असून ४० गाड्या आवक झालेली आहे. त्यापैकी १५ गाड्या नवीन बटाट्याच्या असून दोन गाड्या तळेगावातून तर उर्वरित गाड्या इंदौरमधून दाखल होत आहेत. जुना बटाटा गोडसर लागत असल्याने नवीन बटाट्याला मागणी आहे. नवीन बटाटा चवीला चांगला असल्याने त्याला नेहमीच बाजारात मागणी असते.

## नेरूळ येथे पादुका दर्शन व प्रवचन सोहळा; भाविकांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज दक्षिण पीठ नाणीज, रत्नागिरी यांच्या पादुकादर्शन सोहळा शनिवारी (दि. १७) सकाळी १० वा. तेरणा चॅरिटेबल ट्रस्ट मैदान, सेक्टर १२, नेरूळ (प.) येथे स्वस्वरूप संप्रदाय यांच्यातर्फे आयोजित करण्यात आला आहे.

श्रींच्या पादुकांची मिरवणुकीने सुरुवात होणार आहे. ढोल-ताशांच्या गजरात, टाळ मृदुंगाच्या नादात, वारकरी पथक, कलशधारी सुवासिनी, कोळी नृत्य सादर करणाऱ्या भगिनी अशा विविध परंपरांनी अलंकृत अशी मिरवणूक होणार आहे. त्यानंतर महाराज मार्गदर्शन करणार आहेत. या सोहळ्याला भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री वैद्यकीय कक्ष रायगड जिल्हा प्रमुखपदी रूपेश पाटील



**पनवेल : वार्ताहर**

बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे युवासेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य रुपेश पाटील यांची मुख्यमंत्री वैद्यकीय कक्ष रायगड जिल्हा प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षे हॉस्पिटलमधील अव्वाच्यासव्वा लावलेली बिले कमी करणे, रुग्णांना तातडीच्या सेवा पुरविण्यासाठी हॉस्पिटलला संपर्क करणे, अशा अनेक कर्तव्ये पार पाडत आहेत. अनेक गरजू आणि गरीब रुग्णांना रोज दिवशी सेवा म्हणून रुपेश पाटील आणि त्यांची टीम कार्य करीत आहेत. याच धर्तीवर जिल्ह्याच्या रुग्णांची सेवा घडावी आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षातून लोकांना मदत मिळावी म्हणून सन्माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत यांच्या सूचनेने आणि वैद्यकीय कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्यातर्फे रुपेश पाटील यांची मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या रायगड जिल्हा प्रमुख म्हणून तथा डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या जिल्हा समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त भीम अनुयायांना भोजनदान



**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पक्षातर्फे आयोजित भोजनदानाचा कार्यक्रम केला.

पक्षाच्या वतीने मागील ३५ वर्षे राष्ट्रीय अध्यक्ष मनोज संसारे व युवानेते अनिकेत संसारे यांच्या सहकार्याने सर्व भीम भक्तांना चैत्यभूमी येथे भोजनदान करण्यात येते. महेश साळुंखे यांनी दोन दिवस तेथील व्यवस्था यशस्वीरित्या पार पाडली, तसेच दत्त जयंती निमित्त त्यांनी विविध जयंती उत्सव मंडळांना भेटी दिल्या त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

वडघर सेक्टर आर ४ येथील मंडळाचे रोशन पाटील, कुंभारवाडा पनवेल येथील मंडळाचे राजेश परदेशी, कानिफनाथ मंदिर मंडळाचे प्रशांत गायकवाड, आगरी समाज हॉलजवळील मंडळाचे प्रकाश घरत, तालुका पोलीस स्टेशन एमएसईबी ऑफिस या ठिकाणी त्यांनी भेटी दिल्या व त्यांचा त्या ठिकाणी सत्कार करण्यात आला. दरवर्षी १ जानेवारी रोजी भीमा कोरेगाव येथे शौर्यदिन साजरा करण्यात येतो, तसेच भीमा कोरेगाव येथे जाण्याची तयारी करण्याकरिता कार्यकर्त्यांच्या विभागवार बैठका महेश साळुंखे घेणार आहेत. या बैठकांमध्ये आगामी महापालिका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांविषयी चर्चा करण्यात येणार आहे.

# जल जीवन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

## जनतेच्या प्रेमाची परतफेड कामाच्या रूपाने -आमदार भरत गोगावले

**माणगाव : प्रतिनिधी**

जल जीवन मिशन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत माणगाव तालुक्यातील वडवली येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन गुरुवारी (दि. ८) सायंकाळी आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. या योजनेचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन, या भागात शुध्द व कायम स्वरूपी पाणीपुरवठा केला जाईल, असा विश्वास आमदार गोगावले यांनी या वेळी व्यक्त केला.

आमदार भरत गोगावले पुढे म्हणाले की, सरकारच्या माध्यमातून गाव तिथे पाणी योजना आणि घर तिथे कनेक्शन अशा प्रकारच्या नियोजन करण्यात येईल. वडवली नळ पाणीपुरवठा योजना आम्ही दिलेली आहे, या योजनेतून प्रत्येक घरामध्ये नळ कनेक्शन देण्यात येईल.

वडवलीतील दर्ग्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजनही या वेळी आमदार गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. दर्ग्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम पावसाळ्यापुर्वी पूर्ण करण्यात येईल. जनता आमच्यावर भरभरून प्रेम करतेय, त्याची परतफेड विकासकामाच्या रूपाने निश्चित करू, असे भरत गोगावले म्हणाले.





राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या सहकार्याने आमदार भरत गोगावले यांनी वडवली गावाला पाणी योजना दिली आहे. एक कोटी २१ लाख ५१ हजार ७६० रुपये या पाणी योजनेसाठी मंजूर झाले असून ही योजना पुर्ण झाल्यानंत या परिसरात मुबलक पाणी मिळेल, असे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे रायगड जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी सांगितले.

प्रास्ताविक शरीफ हरगे यांनी केले. हमीदभाई जनाब यांनी मनोगत व्यक्त केले. बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख अरुण चाळके, ज्येष्ठ नेते अॅड. राजीव साबळे, तालुकाप्रमुख अॅड. महेंद्र मानकर, माणगाव नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी सभापती सुजित शिंदे, विभागप्रमुख शरीफ हरगे, वडवली सरपंच अविना मोरे, उद्योगपती प्रकाश टेंबे, शहरप्रमुख सुनील पवार, तळा तालुका प्रमुख प्रधुम्न ठसाळ, विरेश येरुणकर, मधुकर नाडकर, प्रकाश हरवंडकर, प्रकाश गोरीवले, हुसेन येलुकर, लतिफ लोखंडे, रज्ञाब पालेकर, वहाब डावरे, प्रदीप गोरेगावकर, जगदीश भोकरे, नंदू पदरत, तुकाराम लाखाडे, उदय डहाळ आदींसह ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यामध्ये अधिकाधिक गुंतवणूक येण्यासाठी शासन कटिबद्ध -पालकमंत्री उदय सामंत

**अलिबाग : जिमाका**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने पेण, अलिबाग आणि नागोठणे औद्योगिक वसाहतीच्या भागातील २६ किलोमीटर रस्त्यांच्या कामासाठी सुमारे १७ कोटींच्या निधीस मंजूरी दिली असल्याची माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी (दि. ८) येथे दिली.

श्री. सामंत म्हणाले, रायगड जिल्ह्यामध्ये अधिकाधिक गुंतवणूक येण्यास्तव शासन कटिबद्ध असून या भागातील पायाभूत सुविधांसाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला जात आहे. उद्योगांच्या माध्यमातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार आहेत.

पेण, अलिबाग आणि नागोठणे औद्योगिक वसाहत भागातील ही रस्त्याची कामे एमआयडीसीच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत, असे राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले.

## रोह्यात १२३ जणांची नेत्र तपासणी रोहा सिटिझन फोरमचा उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

सिटिझन फोरम ट्रस्ट-रोहा आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल-नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ७) दमखाडी विश्रामगृहात नेत्र तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात १२३ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी मोतीबिंदू आढळलेल्या ७० रुग्णांना नवीन पनवेलमधील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.



आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. वामसी कृष्णन, डॉ. जशनसिंग, सुखविंदर कौर, प्रिया साळवी, नेत्रा होडबे, नरेश आलवार, शिल्पेश साटम आदींनी या शिबिरार्थींची नेत्र तपासणी केली. शिबीर यशस्वी करण्यासाठी रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब यांच्यासह सर्व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

## ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीसाठी शासनाकडून मुदतवाढ

**अलिबाग : जिमाका**

खरीप पणन हंगाम २०२२-२३मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य खरेदीकरिता ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीकरिता १५ डिसेंबर २०२२ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

धान व भरडधान्य खरेदीकरिता ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीसाठी ७ डिसेंबर अखेरपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि ऑनलाईन पोर्टलवरील माहितीनुसार, मागील हंगामाचा विचार करता शेतकरी नोंदणी पुरेशी झाली नाही. चालू हंगामामध्ये पुरेशा प्रमाणावर शेतकरी नोंदणी व्हावी, याकरिता ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणीकरिता १५ डिसेंबर २०२२ अखेर मुदतवाढ देण्यात आली असल्याचे पणन विभागाचे कक्ष अधिकारी विजय मोरे यांनी कळविले आहे.

## खोपोलीत मोकाट कुत्र्यांची दहशत, नागरिक हैराण




**खोपोली : प्रतिनिधी**

मोकाट कुत्र्यांमुळे मागील काही महिन्यांपासून खोपोली शहरातील नागरिक हैराण आहेत. मोकाट कुत्र्यांमुळे होत असलेले अपघात व अन्य समस्यांनी नागरिक बेजार झाले आहेत.

खोपोली शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यातील काही कुत्री पिसाळलेली असल्याने त्यांच्याकडून शाळकरी विद्यार्थी, महिला व नागरिकांवर अचानक हल्ला करून जखमी करण्यात येत आहे. अनेक वेळा नगरपालिका रुग्णालयात रेबीजवरील उपचारासाठीचे इंजेक्शन व औषधे उपलब्ध होत नसल्याने बाधित नागरिकांना नाईलाजाने खासगी रुग्णालयात उपचार करावे लागत आहेत. संपूर्ण शहरात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांची दहशत असून, हातात काठी घेऊन नागरिकांना फिरावे लागण्याची अनोखी स्थिती खोपोलीत निर्माण झाली आहे.

प्राणी मित्र व सामाजिक संस्थानी मिळून सहा महिन्यांपूर्वी शहरातील भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजिकरणाची मोहीम राबवली होती. तरीही खोपोली शहरात भटक्या व मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या संख्येने वाढली आहे.

**स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने शहरातील मोकाट कुत्र्यांना रेबीज प्रतिबंध लसीकरण तसेच निर्बीजिकरण करण्यात आले आहे. अन्य उपाययोजनाही करण्यात येतील.**

**-अनुप दुरे-पाटील, प्रशासक, खोपोली नगर परिषद**

## सेना ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रम उत्साहात

**अलिबाग : जिमाका**

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२२ संकलन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

डॉ.पद्मश्री बैनाडे यांनी ध्वजदिनाचे महत्व विषद केले. सन-२०२१ यावर्षीचे ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळेच रायगड जिल्हा प्रशासनाने ८२.१२ लाख इतके निधी संकलन केले, असल्याची माहिती त्यांनी दिली.

सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सुभेदार (निवृत्त) गोविंदराव सांळुखे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ब्रिगेडिअर (नि.)सुरेश सालोखे, आणि मेजर (निवृत्त) डॉ. आश्लेषा तावडे-केळकर यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी ध्वजदिन निधीकरिता सढळ हाताने मदत केलेल्या या दानशूर व्यक्तींचा आणि निधी संकलनात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विविध शासकीय विभागांचा डॉ. पद्मश्री बैनाडे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच वीरपत्नी चंद्राबाई चव्हाण, शोभा गमरे, वैशाली कोरपे, सुजाता पवार, आशा निकाडे, गिताबाई कासारे, वनिता कळमकर, पार्वतीबाई सकपाळ, जनाबाई पार्टे, सरस्वती कदम आणि वीरमाता निर्मला तुनतुने यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्याप्रमाणे सिध्दी चांगदेव भोसले या विद्यार्थीनीने शालांत परिक्षेत विशेष प्राविण्य मिळविल्याबद्दल १० हजार रुपयांचा धनादेश व प्रशस्तीपत्र देवून तिला गौरविण्यात आले. हवालदार (निवृत्त)जितेंद्र नलावडे यांना सदनिका खरेदीकरिता ५० हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण करंदीकर यांनी केले. उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील, जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक गु. श. हरळय्या, जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुनिता गुरव, जिल्हा पी.पी. समन्वयक सतीश दंतराव यांच्यासह युद्ध विधवा, वीरमाता, वीरपिता, आजी-माजी सैनिक, पत्रकार आणि विविध कार्यालयांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## आत्मनिर्भर अभियानांतर्गत अलिबागमध्ये कृतीसंगम कार्यशाळा

**अलिबाग : जिमाका**

कृषी पायाभूत सुविधा निधी(-खत्र) योजनेच्या कार्यक्षम अंमलबजावणीसाठी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अलिबाग येथे बुधवारी (दि.०७) निवासी जिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळा घेण्यात आली.

प्रमुख मार्गदर्शक कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेचे राज्य समन्वयक एम. एम. कांबळे यांनी सांगितले की, ही योजना २०२१-२२ ते २०३२-३३ या कालावधीसाठी आयोजित करण्यात आली आहे. तसेच या योजनेंतर्गत आठ हजार ४६० कोटी रुपये अनुदान महाराष्ट्र स्तरावर उपलब्ध आहे. रायगड जिल्ह्यातील आतापर्यंत या योजनेंतर्गत सात प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दोन कोटी रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जात असून यामध्ये लाभार्थ्यांना तीन टक्के व्याजदरामध्ये सवलत दिली जाते, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे म्हणाल्या की, रायगड जिल्ह्यामध्ये कृषी पायाभूत सुविधा निधी योजना प्रचार व प्रसिद्धी करण्यासाठी जिल्हास्तरावरील सर्व यंत्रणा व बँक प्रतिनिधी यांच्यामार्फत मेळावे आयोजित करून या योजनेचा व्यापक प्रसार केला जाईल. कृषी पायाभूत सुविधा निधी या योजनेचा तालुक्यातील वैयक्तिक शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी या वेळी केले. या योजनेंतर्गत लाभार्थी अर्ज प्रक्रिया ते अनुदान मिळण्यापर्यंतच्या पूर्ण प्रक्रिया संगणकीय सादरीकरणाद्वारे उपस्थित प्रशिक्षणार्थींना कार्यशाळेमध्ये दाखविण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे अध्यक्ष व संचालक मंडळ, जिल्हा व्यवस्थापक जिल्हा अग्रणी बँक, जिल्हा प्रबंधक प्रदीप अपसंदे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळ्ळया, रायगड जिल्हा बँकचे प्रमुख व्यवस्थापक नांदगावकर, प्रकल्प उपसंचालक सतीश बोराडे, वर्षा पाटील यांच्यासह रायगड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक व कृषी विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## माणगाव टिएमसी कॉलेजमध्ये कौशल्य विकास कार्यशाळा



**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी.सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये विद्यार्थी विकास विभाग व स्वदेश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा. अशोक मोरे व अमित बाकाडे यांनी या कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेत ९८ विद्यार्थी, सहा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

स्वदेश फाउंडेशनचे बाळासाहेब माने यांनी कार्यशाळेची सुरुवात केली. कार्यशाळेत शैलेंद्र तोरणे यांनी संज्ञापन कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, मुलाखतीची तयारी, आत्मविश्वास, ध्येय्य निश्चिती व करीयर यासंबंधी सविस्तर माहिती दिली.

प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी यांनी स्वदेश फाउंडेशनच्या कार्याबद्दल माहिती दिली. अर्चना जाधव यांनीदेखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. स्वदेश फाउंडेशन व टीएमसी कॉलेज यांच्यात लवकरच एक करार केला जाणार असून त्या अंतर्गत प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहे. त्यामध्ये इंग्लिश स्पिकिंग कोर्स, डिजिटल सीटरसी, सेल्फ अवेअरनेस, गोल सेटिंग, करीयर गाईड, एकण्याचे कौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, फायनन्सिअल सीटरसी, प्रेझेंटेशन स्किल इत्यादि सहा महिन्यांचे प्रमाणपत्र कोर्सेस घेतले जाणार आहेत. व त्यातून या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. प्रा. अशोक मोरे यांनी आभार मानले.

## रोहित लोंगलेचे ढोलकी वादनात सुयश

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील उमरोली येथील रोहित सचिन लोंगले (वय १०) या बालकलाकाराला वडाळा मुंबई येथील गौरी संगीत विद्यालयाने आयोजित केलेल्या ढोलकी सोलो स्पर्धेत विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.



या स्पर्धेचे परीक्षक म्हणून देवयानी मोहोळ यांनी काम पाहिले.

गायक असलेले सचिन लोंगले यांचा सुपुत्र रोहित याला गुरुवर्य छगन बुवा निमणे, अनंत बुवा म्हात्रे, जनार्दन बुवा म्हात्रे, सुरेश बुवा भोईर यांचे मागदर्शन लाभले आहे. बालवयातच रोहितने ढोलकी वादनात प्राविण्य प्राप्त केले आहे. वडाळा मुंबई येथील गौरी संगीत विद्यालयाने कै. पं. अनिल शंकर केरकर यांच्या स्मरणार्थ आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये रोहित लोंगले याला विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे, त्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## माजी विद्यार्थ्याच्या मुलीकडून नेणवली शाळेला संगणक संच भेट



**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या नेणवली शाळेचे माजी विद्यार्थी विजय कोंडे यांची मुलगी सहेली विजय कोंडे हिने तब्बल एक लाख निधीचे संगणक संच शाळेला भेट दिले आहेत.

नेणवली प्राथमिक शाळेचे माजी विद्यार्थी विजय कोंडे यांची कॅनडामध्ये राहणारी मुलगी सहेली कोंडे स्वातंत्र्य दिनी (१५ ऑगस्ट) नेणवली शाळेत आली होती. त्यावेळी सहेली हिने शाळेसाठी एक लाख देणगी जाहीर केली होती. या रकमेतून शालेय विद्यार्थ्यासाठी तंत्रज्ञानयुक्त साहित्य म्हणजे दोन संगणक संच, वायफाय, प्रिंटर, संगणक संचासाठी टेबल व स्टूल आणण्यात आले. आणि उर्वरित रक्कम संगणक देखभाल दुरुस्तीसाठी ठेवण्यात आली. या वेळी नेणवली ग्रामपंचायत उपसरपंच शांताराम कोंडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किसन कोडे यांच्या हस्ते विजय व सहेली कोंडे यांचा सन्मान करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. मुख्याध्यापक संतोष हरपाल, उपशिक्षक राजेंद्र अंबिके व गणपत वरघडे या वेळी उपस्थित होते.

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीदेखील तंत्रज्ञानाद्वारे शिक्षण होऊन उंच भरारी घ्यावी, यासाठी माझी ही शाळेला अल्पशी मदत आहे.**

**-सहेली कोंडे, देणगीदार, नेणवली.**

### बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या वनडेसाठी टीम इंडियात बदल

# ‘चायनामन’ कुलदीप यादवला संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) बांगलादेशविरुद्ध शनिवारी (दि. १०) होणाऱ्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यासाठी टीम इंडियामध्ये काही बदल केले आहेत. नियमित कर्णधार रोहित शर्मा, वेगवान गोलंदाज दीपक चहर आणि कुलदीप सेन दुखापतींमुळे तिसऱ्या एकदिवसीय सामन्यातून बाहेर पडले आहेत. त्याचबरोबर ‘चायनामन’ गोलंदाज कुलदीप यादवचा संघात समावेश करण्यात आला आहे.




बीसीसीआयनेही रोहित शर्माच्या दुखापतीबाबत अपडेट दिले आहे. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात क्षेत्ररक्षण करताना रोहितला दुखापत झाली. त्याच्या डाव्या हाताचा अंगठा निखळला होता. असे असतानाही रोहित दुसऱ्या डावात फलंदाजीला आला. बोर्डाने सांगितले, बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याची तपासणी केली आणि ढाका येथील स्थानिक रुग्णालयात त्याचे स्कॅनिंग करण्यात आले. तज्ज्ञांच्या सल्ल्यासाठी तो मुंबईला रवाना झाला असून अंतिम एकदिवसीय सामन्याला तो मुकणार आहे. आगामी कसोटी मालिकेसाठी त्याच्या उपलब्धतेबाबत नंतर निर्णय घेतला जाईल.

**केएल राहुलकडे नेतृत्व**

टीम इंडिया तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात नव्या कर्णधारासह मैदानात उतरणार आहे. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात रोहित शर्माच्या अनुपस्थितीत केएल राहुलने टीम इंडियाची नेतृत्वाची धुरा सांभाळली. अशा परिस्थितीत येत्या सामन्यात फक्त केएल राहुलच कर्णधार असेल. राहुलने आतापर्यंत एक कसोटी, सहा एकदिवसीय आणि एक टी-२० सामन्यामध्ये टीम इंडियाचे नेतृत्व केले आहे.

वेगवान गोलंदाज कुलदीप सेनने पहिल्या एकदिवसीय सामन्यानंतर पाठ जड झाल्याची तक्रार केली होती. बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याची तपासणी केली आणि त्याला दुसऱ्या वनडेपासून विश्रांतीचा सल्ला देण्यात आला. कुलदीप सेनला मानसिक दुखापतीचे निदान झाले असून तो मालिकेतून बाहेर पडला आहे. सहकारी वेगवान गोलंदाज दीपक चहरला दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात डाव्या हाताच्या दुखापतीचा त्रास झाला आणि तो मालिकेतूनही बाहेर पडला. कुलदीप आणि दीपक दोघेही आता त्यांच्या दुखापतींच्या पुढील व्यवस्थापनासाठी एनसीएकडे अहवाल देतील. त्याचबरोबर कुलदीप यादवचा संघात समावेश करण्यात आला आहे.

**भारतीय संघ :** केएल राहुल (कर्णधार) (यष्टीरक्षक), शिखर धवन, विराट कोहली, रजत पाटीदार, श्रेयस अय्यर, राहुल त्रिपाठी, इशान किशन (यष्टीरक्षक), शाहबाज अहमद, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, मोहम्मद सिराज, उमरान मलिक, कुलदीप यादव.

## राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी ‘सीकेटी’च्या विनीत गुप्ताची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवा सेवा संचालनालय अंतर्गत ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित मुंबई विभागीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच बेलापूर येथील वारकरी भवनात झाली. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विनीत महेश गुप्ता (इ. १२वी कॉमर्स) याने चमकदार कामगिरी केली. याबद्दल त्याची राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विनीत गुप्ताचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पत्नीच्या विजयानंतर रवींद्र जडेजाची खास पोस्ट




**जामनगर : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघातील अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाच्या पत्नीने गुजरात विधानसभा निवडणुकीत बाजी मारली आहे. जामनगर (उत्तर) मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या रिवाबा जडेजा यांचा ५० हजारांपेक्षा जास्त मतांनी विजय झाला आहे. पत्नीने मिळविलेल्या या विजयानंतर रवींद्र जडेजाने खास गुजराती भाषेत एक पोस्ट करीत पत्नीला शुभेच्छा दिल्या आहेत.

रवींद्र जडेजाने सोशल मीडियावरून पत्नीच्या विजयावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. पत्नीच्या खांद्यावर हात ठेवून उभे राहत पोज दिलेल्या फोटोमध्ये रवींद्र आणि रिवाबा यांच्या हातात गुजरात एमएलएल म्हणजेच गुजरातमधील आमदार अशा अर्थाची पाटी आहे. घरात काढलेला हा फोटो पोस्ट करताना जडेजाने खास गुजराती भाषेत कॅप्शन दिले आहे. आपल्या पत्नीचे कौतुक करताना खरोखरच तू विजयासाठी पात्र आहेस, असे त्याने म्हटले आहे.

जडेजाने आशापुरा देवीकडे एक मागणीही केली आहे. हॅलो, आमदार! तू खरोखरच यासाठी पात्र आहेस. जामनगरच्या लोकांचा विजय झाला आहे. सर्वांचे मी आभार मानतो. मी आशापुरा देवीला प्रार्थना करतो की जामनगरमधील सर्व कामे नीट व्हावीत. देवी आम्हाला आशीर्वाद दे, अशी कॅप्शन जडेजाने पत्नीबरोबरच्या फोटोला दिली आहे.

## रोहा सानेगाव आश्रमशाळेत प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा

**अलिबाग : जिमाका**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण अंतर्गत प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेचे रोहा तालुक्यातील सानेगाव शासकीय आश्रमशाळा येथे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन आदिवासी विकास ठाणे उपायुक्त प्रदीप पोळ यांच्या हस्ते झाले.

उद्घाटन समारंभास प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, माजी जि. प. सदस्य नंदकुमार म्हात्रे, सानेगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच स्वप्नाली भोईर, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, क्रीडा अधिकारी सचिन निकम, शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष मोतीराम लेंडी, पेण वैद्यकीय अधिकारी डॉ. आशुतोष मोकल, वैद्यकीय पथक आदी उपस्थित होते. या वेळी सहभागी क्रीडा पथकांनी ध्वजसंचलन केले.

पेण प्रकल्प कार्यालयांतर्गत रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १४ शासकीय आश्रमशाळा व १० अनुदानित आश्रमशाळा अशा एकूण २४ आश्रमशाळांतील एक हजार ३४७ विद्यार्थ्यांनी प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला. १४, १७ व १९ या वयोगटांमध्ये वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धा तीन दिवस रंगली.

आदिवासी विकास ठाणे उपायुक्त प्रदीप पोळ आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, खेळामध्ये हार-जीत होतच असते. जे जिंकतील त्यांचे अभिनंदनच, पण जे जिंकणार नाहीत त्यांनी खचून जायचे नाही. आपल्यात न्यूनगंड निर्माण करून न घेता संघर्ष करीत पुन्हा जिंकण्यासाठी अधिक जोमाने तयारी करावी.

प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी प्रास्ताविकात सांगितले की, क्रीडा स्पर्धा खेळाडू वृत्तीने घेतल्या पाहिजेत. खेळात हार झाली तरी हरकत नाही, पण हिंमत हारून चालणार नाही. शून्यातून विश्व निर्माण करता आले पाहिजे. आम्ही शून्यातच होतो, पण संघर्ष करून इथपर्यंतचा प्रवास शक्य झाला आहे. त्यामुळे स्वत:वर विश्वास ठेवा व पराभवाने खचून जाऊ नका.

जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, काही नावीन्यपूर्ण योजना राबवून या खेळाडूंकरिता सुविधा उपलब्ध करून देण्याचे आपण प्रयत्न करणार आहोत तसेच त्यांना खेळामध्ये मार्गदर्शन मिळण्यासाठी क्रीडा विभागातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन या खेळाडूंना उपलब्ध करून देण्यात येईल.

या वेळी सर्व खेळाडूंना क्रीडा शपथ देण्यात आली. सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

## पाकिस्तानविरुद्ध इंग्लंडने रचला इतिहास

### २००० सामने खेळणारा ठरला पहिला संघ



**मुल्तान : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि इंग्लंड संघात तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील दुसरा कसोटी सामना मुलतान येथे सुरू असून बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंड क्रिकेट संघाने शुक्रवारी (दि. ८) पाकिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात मैदानात उतरताच इतिहास रचला आहे. तब्बल दोन हजार आंतरराष्ट्रीय सामने खेळणारा इंग्लंड हा जागतिक क्रिकेटमधील पहिला संघ ठरला आहे.

इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय सामन्यांबद्दल बोलायचे तर या संघाने आतापर्यंत १०५७ कसोटी, ७७३ वनडे आणि १७० टी-२० सामने खेळले आहेत. इंग्लंडनंतर सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या नावावर आहे. ‘कांगारूं’नी आतापर्यंत एकूण १९९५ सामने खेळले आहेत. भारत १७७५ सामन्यांसह या यादीत तिसऱ्या स्थानी आहे, तर पाकिस्तान १६०८ सामन्यांसह चौथ्या स्थानावर आहे.

**सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळणारे संघ**

१. इंग्लंड - २०००*
२. ऑस्ट्रेलिया - १९९५*
३. भारत - १७७५
४. पाकिस्तान - १६०८
५. वेस्ट इंडिज - १५९५

**अबरार अहमदच्या पदार्पणात सात विकेट्स**

इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानी गोलंदाज अबरार अहमदने आपला पदार्पण सामना खेळताना सात गडी बाद केले. त्याने आपल्या फिरकीने इंग्लंडच्या फलंदाजांना नाचविले, ज्यामुळे इंग्लंडचा पहिला डाव ५१.४ षटकांनंतर २८१ धावांवर गुंडळला गेला. अबरारने इंग्लंडच्या पहिल्या डावात जॅक क्रोली, बेन डकेट, ऑली पोप, जो रूट, हॅरी ब्रूक, विल जॅक्स आणि बेन स्टोक्स यांना तंबूत धाडले.

## जलतरणपटू शुभम वनमाळीचा विशेष सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

अर्जुन पुरस्कारासारखा मानाचा समजला जाणारा साहसी खेळामधील तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कार नुकताच नेरूळमधील साहसी जलतरणपटू शुभम धनंजय वनमाळी याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला. यामुळे नवी मुंबईचा नावलौकिकात देश पातळीवर क्रीडा क्षेत्रात उंचावलेला आहे. याबद्दल नवी मुंबई महापालिकेच्या वतीने आयुक्त तथा प्रशासक राजेश नार्वेकर यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या उपस्थितीत शुभमचा शाल, सन्मानचिन्ह आणि ग्रंथभेट प्रदान करून गौरव करण्यात आला.



सन २०१८-१९मध्ये महाराष्ट्र शासनातर्फे मानाच्या शिवछत्रपती पुरस्काराने शुभम वनमाळीचा क्रीडाविषयक कामगिरीचा राज्यस्तरीय गौरव झाला असून तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कार प्रदान होत असताना त्यांनी मांडवा जेट्टी ते एलिफंटा हे २१ किमीचे अंतर ५ तास ४ मिनिटे ५ सेकंदात, गेटवे ऑफ इंडिया ते डहाणू बीच हे १४७ किमीचे अंतर २८ तास ४० मिनीटात, राजभवन भवन ते गेट वे ऑफ इंडिया हे १४ किमी चे अंतर ३ तास १३ मिनिटे १० सेकंदात पार केल्याचा विशेष उल्लेख करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय ओपन वॉटर जलतरणपटू ही ओळख असणीषया शुभम वनमाळीने यापूर्वी इंग्लिश खाडी, जिब्राल्टरची सामुद्रधुनी, कॅटनीला खाडी, मॅनहटन मॅरेथॉन स्वीम, राऊंड ट्रिर अन्जल आयलँड स्वीम, परहेन्शियन आयलँड मॅरेथॉन स्वीम अशा विविध राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खाड्या विक्रमी वेळेत पोहून जागतिक विक्रम केलेले आहेत. यशाचे कौतुक विविध स्तरांतून झालेले असून त्यांच्या विक्रमांमुळे नवी मुंबईच्या क्रीडा विश्वाची शान वाढलेली आहे.

अनेक विक्रमांनी, पुरस्कारांनी सन्मानित शुभम वनमाळीचा राष्ट्रीय स्तरावरील साहसी खेळातील सर्वोच्च मानाचा तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल नवी मुंबई महापालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने ऐरोली सेक्टर १५ येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात विशेष सत्कार करण्यात आला.

स्वच्छ सर्वेक्षणात देशात तृतीय क्रमांकाचे स्वच्छ शहर म्हणून नावाजल्या जाणाऱ्या नवी मुंबई महापालिकेच्या स्वच्छ नवी मुंबई मिशन अंतर्गत शुभम वनमाळी स्वच्छता युथ आयकॉन आहे.

## व्यंकटेश प्रसाद होणार बीसीसीआय निवड समितीचा नवा अध्यक्ष?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद हा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) निवड समितीच्या नवीन अध्यक्षपदी विराजमान होण्याची शक्यता आहेत. बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांच्याकडे लवकरच नव्या निवड समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात येणार आहे.

व्यंकटेश प्रसाद यांनी आपल्या कारकिर्दीत गोलंदाज म्हणून भारतासाठी ३३ कसोटी आणि १६१ एकदिवसीय सामने खेळले आहेत. त्याच्या खात्यात २९० आंतरराष्ट्रीय विकेट्स आहेत. या महिन्याच्या अखेरीस नवीन निवड समिती अंतिम केली जाईल आणि अध्यक्षपदी प्रसाद यांची घोषणा केली जाईल.

व्यंकटेश प्रसाद यांनी दक्षिण विभागातून प्रतिनिधी म्हणून नवीन अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. पश्चिम विभागातून सलील अंकोलाचे नाव बऱ्याच वेळा आले आहे. बीसीसीआय खजिनदार आशिष शेलार यांचे पाठबळ मिळाल्यास भारताचा माजी वेगवान गोलंदाजाची निवड होऊ शकते. पूर्व विभागातून ओडिशाचे एसएस दास निवडले जाऊ शकतात. उत्तरमधून मनिंदर सिंग, अतुल वासन आणि निखिल चोप्रा हेही स्पर्धेत आहेत. नयन मोंगिया हे मध्य विभागातून संभाव्य म्हणून चर्चेत असलेले दुसरे नाव आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com